रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३४६
www.ramprahar.com

बुधवार, ३ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाची दखल/२
नेरळमधून जनावरे चोरून नेणारे पोलिसांच्या ताब्यात/५
पनवेल मनपातर्फे सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा/८

## विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १४ उमेदवार रिंगणात



**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ जागांसाठी एकूण १४ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. सत्ताधारी महायुतीचे नऊ (भाजप पाच, शिवसेना दोन, राष्ट्रवादी काँग्रेस दोन) उमेदवार; तर विरोधी महाविकास आघाडीच्या तीन (काँग्रेस, ठाकरे गट, शेकाप प्रत्येकी एक) उमेदवारांनी अर्ज भरले. याशिवाय अरुण जगताप आणि अजय सिंह सेंगार या दोन अपक्षांनी अर्ज दाखल केले. ११ जागांसाठी एकूण १४ उमेदवारांनी अर्ज भरले गेल्याने चुरस वाढली आहे. दरम्यान, बुधवारी (दि. ३) उमेदवारी अर्जांची छाननी होईल, तर अर्ज मागे घेण्याची ५ जुलै ही शेवटची तारीख आहे. निवडणूक बिनविरोध करायची झाल्यास कोणते तीन उमेदवार अर्ज मागे घेणार याची उत्सुकता सगळ्यांना आहे. तसे न झाल्यास १२ जुलै रोजी मतदान प्रक्रिया होऊन त्याच दिवशी निकाल लागेल.

# चवदार तळ्याचे जलशुद्धीकरणासह होणार सौंदर्यीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

महाड येथील चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर योजना राबविण्यात येईल. या योजनेसाठी ६५ कोटी रुपयांचा आणि चवदार तळे परिसर सौंदर्यीकरणाच्या कामासाठी सात कोटी रुपयांचा असा एकूण ७२ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येईल. नवीन प्रस्तावानुसार चवदार तळ्याशी संबंधित संपूर्ण विकासकामे करण्यात येतील, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत मंगळवारी (दि. २) प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

मंत्री सामंत म्हणाले की, चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी सद्या ऑरगॅनिक बायोटेक या कंपनीकडून दरमहा मायक्रोबाएबल कल्चरचे मिश्रण तलावात सोडून पाणी शुद्धीकरण केले जात आहे. ही पाणी शुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित असून अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर ओझोनवर आधारित प्रक्रिया करुन चवदार तळ्यातील पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येईल. याबाबतचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे प्राप्त झाला आहे. या प्रस्तावाला १५ दिवसांत उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.



### मंत्री उदय सामंत यांची अधिवेशनात माहिती

महाड शहरातील चवदार तळ्यास राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा असून त्याची देखभाल व दुरुस्ती नगर परिषदेच्या स्व-निधीतून व शासनाच्या विविध योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यात येते. रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी प्रथमच शासकीय जयंती साजरी करण्यात आली असून तेथे स्मारक उभारणार असल्याची माहिती मंत्री सामंत यांनी सभागृहात दिली.

### काम लवकर सुरू व्हावे; आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई, पनवेल :** महाड येथील चवदार तळ्याचे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले.

चवदार तळ्याची दुरवस्था झाली असून त्यातील पाणी पिण्यायोग्य राहण्यासाठी आवश्यक ती देखभाल न केल्याने पाण्यावर शेवाळ साठून दुर्गंधी पसरली आहे. परिणामी पाणी प्रदूषित होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे निर्दशनास आले आहे. (पान २ वर...)




## यूपीमध्ये सत्संगात चेंगराचेंगरी; सुमारे १०० जणांचा मृत्यू

**हाथरस : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशात मोठी दुर्घटना घडली आहे. हाथरसमधील फुलराई येथे मंगळवारी (दि.२) सत्संगात चेंगराचेंगरी होऊन सुमारे १०० जणांचा मृत्यू झाला, तर अनेक लोक जखमी झाले आहेत.



भोले बाबांचा हा सत्संग आयोजित करण्यात आला होता. या सत्संगाच्या समारोपावेळी अचानक चेंगराचेंगरी झाली. यातील जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत व मोफत उपचार करण्याचे आदेश दिले आहेत तसेच या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# असंविधानिक वर्तन भोवले!

## अंबादास दानवे यांचे पाच दिवसांसाठी निलंबन

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सोमवारी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात भाजपचे आमदार प्रसाद लाड यांच्यावर खालच्या पातळीवर टीका आणि शिवीगाळ केली होती. त्यामुळे दानवे यांचे पाच दिवसांसाठी निलंबन करण्यात आले आहे.



विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या वक्तव्यावर भाजपचे आमदार आक्रमक झाले होते. आमदार प्रसाद लाड यांनी दानवे यांच्या राजीनाम्याची मागणी केली तसेच विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. त्यानंतर विधान परिषदेमध्येही सत्ताधाऱ्यांनी आक्रमक होत दानवे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काही वेळासाठी कामकाज स्थगित केले होते. त्यानंतर पुन्हा कामकाज सुरू झाले.

या वेळी भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अंबादास दानवे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यासंदर्भात सभागृहात प्रस्ताव मांडला. या वेळी विरोधी पक्षाकडून यावर चर्चा करण्याची मागणी करण्यात आली, मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या नेत्यांकडून अशा प्रस्तावावर चर्चा होत नाही, असे स्पष्ट केले. यानंतर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दानवे यांचे पाच दिवसांसाठी निलंबन केले. या पाच दिवसांमध्ये दानवे यांना सभागृहात येण्यासही बंदी असणार आहे.

# एक लाख कोटींच्या योजनांचा क्रांतिकारी अर्थसंकल्प

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी मानले सरकारचे आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, वारकरी, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. एक लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्ज्वल करणारा असून महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असल्याचे सांगत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २) पनवेल येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देत सरकारचे अभिनंदन आणि आभार व्यक्त केले.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासासाठी अनेक योजना अमलात आणत देशाला सक्षम केले. आता तिसऱ्या पर्वातही काम सुरू आहे. त्याच धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पातून महिला, ज्येष्ठ, युवा, शेतकरी, दुर्बल घटकांसाठी विविध योजना सादर करतानाच पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजना मांडत राज्याच्या विकासावर भर दिला असून या महत्वपूर्ण अर्थसंकल्पातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले. त्यांनी पुढे पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, (पान २ वर...)

## निवडक

### 'नीट' पेपरफुटी प्रकरणातील आरोपींना सीबीआय कोठडी

**लातूर :** नीट पेपरफुटी प्रकरणातील लातूर पोलिसांकडे अटक असणारे दोन आरोपी जलील पठाण आणि संजय जाधव यांना ६ तारखेपर्यंत सीबीआय कोठडी देण्यात आली आहे. या आरोपींचा ताबा आमच्याकडे सोपवण्यात यावा यासाठी सीबीआय पथकाने लातूर जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यावर मंगळवारी (दि. २) सुनावणी झाली. कोर्टाने सीबीआयचा अर्ज मंजूर केला असून आरोपींचा ताबा तसेच तपासातील सर्व कागदपत्रे व जप्त ऐवज महाराष्ट्र पोलिसांनी सीबीआयकडे द्यावा, असा आदेश दिला आहे.

### पुणे-सोलापूर हायवेवर कार अपघातात पाच जण ठार

**इंदापूर :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर तालुक्यातील डाळज येथे ब्रिझा गाडीच्या झालेल्या भीषण अपघातात पाच तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा अपघात मंगळवारी (दि. २) सायंकाळी घडला. अपघातात एक तरुण जखमी झाला असून सर्व जण तेलंगणा राज्यातील असल्याची माहिती समोर येत आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत आता ३१ ऑगस्टपर्यंत

### शेतीची अट वगळली, वयोमर्यादा वाढवली

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार उपस्थित होते.

योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या महिलांना १ जुलैपासून लाभ देण्यात येईल असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतानाच योजना सुलभ आणि सुटसुटीतपणे राबविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी विभागाला दिले.

अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देतानाच योजनेसाठी एकर शेतीची अट वगळण्याचा, लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगटाऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्याचा, परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल, तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल, असा निर्णय या वेळी घेण्यात आला.

अडीच लाख रुपये उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल, तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेलासुद्धा लाभ देण्यात येणार आहे.

# काँग्रेस परजीवी, सोबत असणाऱ्यांनाच खाऊन टाकते!

### पंतप्रधान मोदींची संसदेत फटकेबाजी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेतील राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला मंगळवारी (दि. २) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर दिले. पंतप्रधानांनी भाषण सुरू केल्यानंतर विरोधकांनी गदारोळ सुरू केला, मात्र विरोधकांच्या गदारोळातही पंतप्रधानांनी आपले भाषण सुरूच ठेवले. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधकांना अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र विरोधी नेत्यांनी त्यांचे ऐकले नाही. जवळपास अर्ध्या तासाच्या भाषणात पीएम मोदींनी काँग्रेसवर एकापाठोपाठ एक हल्ले केले. या वेळी काँग्रेस आता परजीवी झाली असल्याचेही ते म्हणाले.



काँग्रेसला साथ देणाऱ्या पक्षांसंदर्भात बोलताना मोदी म्हणाले, काँग्रेसच्या सहकारी पक्षांनी लोकसभा निवडणूक निकालांचे व्यवस्थित विश्लेषण केले नाही, असे वाटते. २०२४च्या निवडणुकीनंतर काँग्रेस परजीवी झाली आहे. ही आता परजीवी काँग्रेस आहे. परजीवीसंदर्भात बोलताना मोदी म्हणाले, परजीवी ज्याच्यासोबत असते, त्यालाच खाऊन टाकते.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, आजकाल काँग्रेसचे नेते शिर्षासनात व्यस्त आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालात त्यांना पराभव दिसत नाही. काँग्रेस लहान मुलांप्रमाणे वागत आहे. ज्या राज्यात त्यांनी एकट्याने निवडणूक लढवली, तेथे त्यांच्या मतांची टक्केवारी कमी झाली आहे, हे काँग्रेसने समजून घ्यायला हवे. काँग्रेसची अवस्था सध्या अशी झाली आहे, जसे एखाद्या मुलाचे मनोरंजन केले जात आहे.

**मी देशवासीयांना आश्वासन देतो की, विकसित भारताचा संकल्प प्रामाणिकपणे पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आमचा प्रत्येक क्षण आणि शरीराचा प्रत्येक कण समर्पित करू.**

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

राहुल गांधी यांच्या सोमवारच्या भाषणाचा समाचार घेताना, सहानुभूती मिळवण्याचे काम सुरू आहे, असा टोला मोदींनी नाव न घेता लगावला.

### दहशतवादाला प्रत्युत्तर दिले

या वेळी दहशतवादाचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की २०१४पूर्वी दहशतवादी कोठेही हल्ले करण्यास मोकळे होते. तेव्हा निष्पाप लोकांना प्राण गमवावे लागले होते आणि सरकार शांत राहण्याशिवाय काहीही करीत नव्हते, पण २०१४नंतर हा नवा भारत घराघरात पोहचला आहे. आज कलम ३७०ची भिंत पडली आहे, दगडफेक थांबली आहे, लोकशाही मजबूत आहे आणि लोक भारताच्या संविधानावर मोठ्या विश्वासाने मतदान करण्यासाठी पुढे येत आहेत, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले आहे.

# पारंपरिक गीतांच्या सुरात भातलावणीला वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

बऱ्यापैकी पाऊस झाल्याने रायगड जिल्ह्यातील बळीराजा शेतीकामांमध्ये व्यस्त झाला आहे. सध्या भातलावणी सुरू असून यानिमित्ताने शेतशिवारात पारंपरिक गाण्यांचे स्वर कानावर पडत आहेत.



भातपिकाची लावणी करताना जिल्ह्यात लोकगीते म्हणायची पूर्वापार पद्धत आहे. ग्रामीण बोलीभाषेच्या माध्यमातून महिलांना एक प्रकारे स्फूर्ती व ऊर्जा मिळते. गाणी म्हणत महिला कामात तल्लीन होऊन जातात. सध्या ठिकठिकाणी लोकगीतांचे मधुर सूर कानी पडतात.

येसू सुंदरी पाऊस पडे भारी ये माझ्या घोंगडीखाली गं, पहिली सर घेईन डोईवरी नको तुझ्या घोंगडीखाली गं अशा प्रकारची ग्रामीण बोलगीतांच्या स्वरात शिवारात भातलावणीची कामे सुरू आहेत. विठू रे मला पंढरी जाऊ दे, जनाईचे दर्शन घेऊ दे रे मला पंढरी जाऊ दे अशी देवाधर्माची गाणी गात देवभक्तीही आळवली जाते. याशिवाय आपल्या माहेरचे प्रेम, तेथील माणसांबद्दलची ओढ, जिव्हाळा यांचे दर्शन घडवणारी गाणीदेखील ऐकायला मिळतात.

पारंपरिक लोकगीते अशी कोकणी संस्कृतीची ओळख आहे, तर दुसरीकडे शेतीकामाचा अनुभव यावा यासाठी नवतरुणीही भातलावणीत व्यस्त आहेत, मात्र तरुण मंडळी ही पारंपरिक लोकगीतांऐवजी डीजेची गाणी म्हणत आणि हास्याचे कल्लोळ उडविणारे चुटकुले, नव्या पिढीची हिंदी व मराठी चित्रपटांची गाणी म्हणत शेतातील कामे उरकण्यात व्यग्र असल्याचे दिसते.

शेतीचे क्षेत्र कमी होत असले आणि युवावर्ग शेतीपासून दूर जात असले तरी कामाचा शीण घालवण्यासाठी पारंपरिक गीतांची परंपरा आजही कोकणी शेतकऱ्यांनी टिकवून ठेवली आहे. या गाण्याच्या सुरांमध्ये वैविध्य असल्याचे पहायला मिळते.

### प्रांतवार वैविध्य

दर दहा मैलांवर भाषा बदलते, तशी गाणीदेखील बदललेली पहायला मिळतात. दक्षिण रायगडात महाड, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर या तालुक्यात भातलावणीच्या गाण्यांमध्ये वैविध्य दिसून येते. त्यात पारंपरिक लोकगीतांचा बाज आढळून येतो, तर उत्तर रायगडातील अलिबाग, पेण, उरण भागात विशेषतः देवाधर्माच्या गाण्यांवर भर असतो. काही ठिकाणी ग्रामीण लोकगीतांचे सूर ऐकायला मिळतात. अलिबाग भागात शेतात म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांना आंबोण्या असे संबोधले जाते.

## आषाढी सोहळ्यासाठी पंढरपूर परिसरात होणार आकर्षक विद्युत रोषणाई

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आषाढी यात्रेत यंदा प्रथमच अगदी भंडीशेगावपासून पंढरपूर शहरापर्यंत ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यंदाची आषाढी एकादशी आजपर्यंतच्या सोहळ्यातील खास असेल, असा विश्वास सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केला आहे.

'आषाढी'साठी पंढरपूर मंदिराला रोषणाई केली जाते. या वर्षी प्रथमच भंडीशेगाव, वाखरी या पालखी मार्गावरील इमारती, झाडांनाही आकर्षक विद्युत रोषणाई करून लाखो भाविकांचे स्वागत केले जाणार आहे. यानंतर पालखी सोहळे पंढरपुरात पोहचल्यावर इसबावी, कॉलेज चौक, चंद्रभागा वाळवंट, भाविकांचे निवासस्थळ असणारे ६५ एकरावरील भक्तिसागर अशा विविध ठिकाणीदेखील आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यासाठी विविध जागांची पाहणी झाली असून पालखी सोहळे येण्यापूर्वी ही विद्युत रोषणाई पूर्ण केली जाणार आहे.

## प्रेषितांच्या अभयमुद्रेचा राहुल गांधींचा दावा अजमेरच्या चिश्तींनी फेटाळला

**अजमेर : वृत्तसंस्था**

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेले भाषण वादग्रस्त ठरले. या भाषणादरम्यान राहुल यांनी हिंदूंचे दैवत असलेल्या शिवशंकराच्या अभयमुद्रेचा उल्लेख केला. कुराणामध्येही घाबरू नका, असा उल्लेख असल्याचा दावा केला. दरम्यान, राहुल गांधी यांच्या अभयमुद्रेबाबतच्या विधानाला मुस्लिम धर्मगुरूंनी विरोध केला आहे. इस्लाममध्ये याचा कुठलाही उल्लेख नाही. त्यामुळे राहुल गांधी यांनी त्यांचे विधान मागे घेतले पाहिजे, असे अजमेर शरीफचे हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनी म्हटले आहे.



राहुल गांधी यांच्या हिंसक हिंदू आणि अभयमुद्रा अशा केलेल्या उल्लेखांमुळे वादाला तोंड फुटले आहे. आपल्या भाषणामध्ये राहुल यांनी सांगितले की, अभयमुद्रेचा संकेत भगवान शिव, गुरू नानक, येशू ख्रिस्त, बुद्ध आणि भगवान महावीर यांनीही दिलेला आहे. राहुल गांधी यांनी अभय मुद्रेचा इस्लामसोबतही उल्लेख केला.

यानंतर अजमेर शरीफचे हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनी एएनआयला सांगितले की, आम्ही राहुल गांधींचे भाषण ऐकले आहे. त्यांनी इस्लाममधील प्रार्थनांशी अभयमुद्रेला जोडले आहे तसेच इस्लाममध्ये या मुद्रेचा उल्लेख असल्याचा दावा केला आहे, मात्र असा उल्लेख आमच्या धार्मिक पुस्तकांमध्ये आणि इस्लामच्या शिकवणीमध्ये कुठेही लिहिलेला नाही. कुठल्या धर्मामध्ये कुठली चिन्हे आहेत याची राहुल गांधी यांना माहिती असली पाहिजे, असेही चिश्ती पुढे म्हणाले.

# एसटी महामंडळाला सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील

## मंत्री दादा भुसे यांची विधानसभेत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते देण्यासाठी महामंडळाला शासनाकडे मदत मागायची गरज पडू नये यासाठी महामंडळाला अधिकाधिक उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्यात येत आहे. एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी मंगळवारी (दि.२) विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



एसटी महामंडळाबाबत सदस्य कृष्णा गजबे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री भुसे म्हणाले की, महामंडळाच्या ताफ्यात ५,१५० नवीन इलेक्ट्रिक बस भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. मागणीनुसार सर्व आगारांना बस देण्यात येत आहेत. बी. एस. मानकाच्या दोन हजार ४२० बस खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, तसेच एक हजार जुन्या डिझेल बस सीएनजीवर आणि पाच हजार बस एलएनजी (लिक्विड नॅचरल गॅस)वर रूपांतरित करण्यात येत आहे. यामुळे डिझेल व दुरुस्तीवरील खर्चात बचत होणार आहे.

शासनाने महामंडळाला विद्यार्थी प्रवास सवलत योजनेपोटी ८३७ कोटी, अमृत ज्येष्ठ नागरिक विनामूल्य प्रवास सवलत योजनेसाठी एक हजार १२४ कोटी, महिला सन्मान योजनेकरीता एक हजार ६०५ कोटी रुपयांची प्रतिपूर्ती केली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत पास देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला सन्मान, ज्येष्ठ नागरिक अमृत योजना आणि विद्यार्थी प्रवास सवलत योजना यामधून शासन महामंडळाला प्रतिपूर्ती पोटी कोट्यवधींचा निधी देत आहे.

महामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत करण्यात येत आहे. मागील काळात एसटी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन केल्यानंतर शासनाने आंदोलनकर्त्यांसमवेत समवेत बैठक घेऊन सकारात्मक चर्चा केली. त्यामुळे आंदोलन स्थगित झाले. शासनाने वेतन, भत्ते, वेतनवाढ, बोनस, महागाई भत्ता याबाबत मागण्या पूर्ण करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या दोन बैठका झालेल्या आहेत. या समितीने अहवाल दिल्यानंतर अहवालानुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

या चर्चेत बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, बच्चू कडू, रोहित पवार, विश्वजित कदम यांनी भाग घेतला.

# कोयना प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाची मुख्यमंत्र्यांकडून दखल

## आज विधिमंडळात बैठकीचे आयोजन

**चौक : प्रतिनिधी**

अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाच्या वतीने मुंबई येथे आझाद मैदानावर प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन सुरू झाले असून त्याची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. बुधवारी (दि.३) विधिमंडळात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या लढ्याला यश येईल, अशी अपेक्षा कोयना प्रकल्पग्रस्तांच्या मनात निर्माण झाली आहे.

सातारा जिल्ह्यातील कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे १०५ गावांचे स्थलांतर १९५९ साली रायगड, ठाणे, सातारा, रत्नागिरी, सांगली, पालघर जिल्ह्यात झाले. त्या वेळी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. तत्कालीन नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन प्रकल्पग्रस्त जनतेने स्वखर्चाने जमिनी घेऊन वसाहती स्थापन केल्या. गेली ६४ वर्षे पर्यायी जमिन, नागरी सुविधा, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले, बेरोजगार भत्ता यापासून प्रकल्पग्रस्त वंचित आहेत. त्यामुळे अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाच्या माध्यमातून लढा सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या आंदोलनाची दखल घेऊन मंत्री शंभूराजे देसाई यांनी अखिल कोयना पुनर्वसाहत संघाला मंत्रालयात पाचारण केले असून तिथे शिष्टमंडळाशी चर्चा झाली. शिवसेना सचिव आणि ठाणे महानगर पालिका माजी महापौर संजय मोरे यांनी आंदोलन ठिकाणी येऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या बैठकीचे पत्र वाचून दाखवले.

या वेळी संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या नेतृत्वाखाली कार्याध्यक्ष अर्जुन कदम, उपाध्यक्ष अमोल कदम, आनंद सकपाळ, एम. डी. चाळके, सल्लागार पवन कदम, मारुती देवरे, किसन जाधव, दिलीप कदम, अशोक जाधव, राम पवार, समीर कदम, बळीराम शिंदे, प्रशांत कदम, वत्सला मोरे, सुवर्णा शिंदे, शर्मिला मोरे, जगन्नाथ साळुंखे, सदानंद भातोसे, हरी भोसले, केशव मोरे, निलेश कदम, संतोष कदम यांच्यासह प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.




# ऊसर्लीच्या माजी सरपंचांच्या उलट्या बोंबा!

## माजी सदस्य मच्छिंद्र पाटील यांनी केली खोट्या आरोपांची पोलखोल

**पनवेल : प्रतिनिधी**

तालुक्यातील ऊसर्ली गावातील माजी सरपंच विश्वास भगत यांनी व्हायरल केलेल्या एका बातमीमागील सत्य माजी सदस्य मच्छिंद्र पाटील यांनी माध्यमांसमोर मांडले. ते म्हणाले की, भ्रष्टाचाराची परिसीमा गाठल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल झालेल्या माजी सरपंचांना आरोप करण्याचा कुठलाही नैतिक अधिकार नाही. पायाच्या नखापासून डोक्यापर्यंत भ्रष्टाचारात बरबटलेल्या माजी सरपंचांनी आरोप करणे म्हणजे चोराने उलट्या बोंबा मारण्याचा प्रकार होईल.



ते पुढे म्हणाले की, माजी सरपंच विश्वास भगत यांनी ऊसर्ली गाव १० वर्षे मागे नेऊन ठेवला आहे. ज्या सोसायटीमधील सांडपाणी वाहण्याच्या प्रकाराची ते तक्रार करीत आहेत, त्या इमारतीला बांधकामाचा परवाना आणि पूर्णत्वाचा दाखला त्यांच्याच स्वाक्षरीने दिलेला आहे. व्हायरल बातमीमध्ये माजी सरपंच म्हणतात की, पाणी, रस्ते, लाईट देणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. भूतकाळात याच व्यक्तीने या इमारतीला हे सारे व्यवस्थित असल्याचा स्वतःच्या स्वाक्षरीने दाखला दिलेला आहे. मग दाखला देतेवेळी त्यांनी या गोष्टींची पाहणी केली होती का? हा प्रश्नदेखील उपस्थित होतो.



ऊसर्ली ग्रामपंचायतची वार्षिक आवक दोन कोटी आहे. वास्तवात गावाची वार्षिक आवक एक कोटी ४४ लाख आहे. म्हणजे यांनी वार्षिक आवक आकडा सांगण्यातसुद्धा ५६ लाखांचा घोळ केला. विद्यमान बॉडी प्रामाणिकपणे काम करीत आहे. आमचे ग्रामस्थ माजी सरपंचांच्या भ्रष्टाचाराला कंटाळले आहेत. विद्यमान बॉडीने अद्यापपर्यंत जवळपास पाच कोटींची जुनी देणी दिली आहेत. विद्यमान बॉडीने तुटपुंज्या निधीमध्येदेखील खूप सुंदर काम करायचा प्रयत्न केला आहे. या बॉडीला यश मिळू नये, म्हणून माजी सरपंच ग्रामस्थांना कर भरू नका, असे सांगत आहेत. त्याची स्वतःची पाच लाख २८ हजार रुपये कराची थकबाकी निघते. ग्रामपंचायतने रस्ते बनवले की, तोंडाच्या वाफा सोडत आरोप करणारे माजी सरपंच त्यांचे पोकलेन आणि जेसीबी मुद्दाम त्या रस्त्यांवरती फिरवतात. विद्यमान बॉडीची नाचक्की करण्यासाठी बांधलेले रस्ते क्षतीग्रस्त करण्याचे नादान कृत्य ते करतात. या सगळ्याचे माझ्याकडे पुरावे आहेत, असे सांगत त्यांनी माजी सरपंचांचे पोकलेनमुळे रस्त्याला होत असलेले नुकसान माध्यमांना दाखवले.

# कुणबी समाजाचे प्रश्न लवकरच मार्गी लागणार



**माणगाव : प्रतिनिधी**

कुणबी समाजाचे वर्षानुवर्ष प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी सोमवारी (दि.१) बळीराज सेना अध्यक्ष अशोक वालम यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह एक मॅरेथॉन बैठक झाली.

बैठकीत तिलोरी कुणबी ८३मध्ये पोटजात म्हणून समाविष्ट करून घेणे, बेदखल कुळांचा प्रश्न निकालात काढणे, कोकणातील प्रत्येक तालुक्यात कुणबी सांस्कृतिक भवन शासनाने बांधून देणे, शामराव पेजे कोकण आर्थिक विकास महामंडळातून कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजमधील तसेच इतर व्यावसायिकांना बिनव्याजी भांडवल देण्यात यावे, जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा तुकाराम बीज हा शासकीय कार्यक्रम घेण्यासाठी परिपत्रक काढणे, बारसू रिफायनरी विरोधी आंदोलकांवर झालेले गुन्हे मागे घेणे, महाराष्ट्रातील शाळांच्या खासगी कंत्राटी वाहन संघटनेचा विषय मार्गी लावणे, पालघर, शहापूर, ठाणेमधील इको सेन्सिटिव्ह झोन यावर मार्ग काढणे अशा अनेक प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेऊन तसेच उपस्थित असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांकडून आदेश देण्यात आले.

या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत, बळीराज सेनाध्यक्ष अशोक वालम, प्रकाश तरळ, नंदकुमार मोहिते, सुरेश भायजे, कुणबी समाजोन्नती संघाचे सदानंद काष्टे, अरविंद डाफळे, बबन उंडरे, हरिश्चंद्र पाटील, गणेश मौले, अशोक करंजे, कृष्णा वने, श्रावण इंगळे, राजाराम ढोलम यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

पान १ वरून

## चवदार तळे येथील काम लवकर सुरू व्हावे; आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

या तळ्याकरिता लाखो रुपये खर्च करण्यात येऊनही चवदार तळ्याचे पाणी पिण्यायोग्य नसल्याने महाड नगर परिषदेने चवदार तळे शुद्धीकरण व सौंदर्यीकरणाचा ६५ कोटी रुपयांचा सादर केलेला प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून शासनाकडे मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे का? असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी करून तळ्याचे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नाला लेखी उत्तरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, महाड नगरपरिषदेच्या हद्दीतील चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी मे. ऑरगॅनिक बायोटेक प्रा.लि. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्यामार्फत दरमहा मायक्रोबाएबल कल्चरचे मिश्रण तलावात सोडून त्याद्वारे पाणी शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, या पद्धतीने पाणी पिण्यायोग्य राहत नसल्याने पंजाब राज्यातील अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर ओझोन प्रक्रिया करून चवदार तळे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचा रु.६५.५२ कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सहायक आयुक्त, समाज कल्याण, रायगड यांच्याकडे सादर केला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्द्यांची पूर्तता करण्याच्या सूचना त्यांच्याकडून प्राप्त झाल्या असून त्याची पूर्तता नगर परिषदेकडून करण्यात येत आहे. चवदार तळ्यास राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा असून त्याची देखभाल व दुरुस्ती नगर परिषदेच्या स्वनिधीतून व शासनाच्या विविध योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यात येते. नगर परिषदेने चवदार तळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास समाजकल्याण विभागाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर तळे व आजूबाजूच्या परिसराचे सौंदर्यीकरण करण्याचे नगर परिषदेचे नियोजन आहे.

## एक लाख कोटींच्या योजनांचा क्रांतिकारी अर्थसंकल्प

महिलांसाठी विविध योजना आखत त्यांचे सक्षमीकरण करण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे. अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची महत्त्वाकांक्षी अशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेंतर्गत २१ ते ६० वर्षे वयोगटातील पात्र महिलांना राज्य सरकारच्या वतीने दर महिना एक हजार ५०० रुपये देण्यात येतील. या योजनेसाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार असून योजनेची अंमलबजावणी जुलैपासून होईल, अशी घोषणा अजित पवार यांनी केली आहे. त्या अनुषंगाने पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना महिलांना या योजनेची सविस्तर माहिती व मार्गदर्शन मिळावे यासाठी येत्या रविवारपासून पनवेल, कळंबोली, खांदा कॉलनी, कामोठे, खारघर येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

अर्थसंकल्पात वारकरी बांधवांसाठी तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव, पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपये, 'निर्मल वारी'साठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू–आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी विविध योजना आखण्यात आल्या असून मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना राज्यातील ४४ लाख सहा हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरवली जाणार आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत दोन हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप, कांदा उत्पादकांसाठी फिरता निधी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै २०२४पासून पुढे चालू ठेवण्यात येणार आहे. शेळी–मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प, अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खासगी क्षेत्रावर बांबूची लागवड प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान देण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.


युवावर्गासाठी विविध योजनांमध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना यामध्ये दरवर्षी १० लाख तरुण–तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना–प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन, शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण, जागतिक बँक सहाय्यित दोन हजार ३०७ कोटी रुपये किमतीचा मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्य विकास–५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ, मॉडेल आयटीआय, जागतिक कौशल्य केंद्र, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डेटा सेंटर अशा विविध संस्थांचे बळकटीकरण, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यास मान्यता, स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित, ग्रामीण भागात ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र स्थापन, १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण, संशोधन व नवउपक्रम केंद्रांसाठी विद्यापीठ व शासनाकडून प्रत्येकी ५० कोटी असा एकूण १०० कोटी रुपयांचा निधी, नवी मुंबई महापे येथे २५ एकर जागेवर इंडिया जेम्स अॅन्ड ज्वेलरी पार्क नियोजित दोन हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग केंद्र आणि त्या अनुषंगाने ८०० स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. त्याचबरोबर पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजना अंतर्गत मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता, १२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या, या वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार, शिवडी–वरळी जोडरस्त्याचे काम डिसेंबर २०२५अखेर पूर्ण करण्यात येणार, ठाणे किनारी मार्ग लांबी १३.४५ किलोमीटर तीन हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे काम, १९ महापालिकांमध्ये पीएम ई–बस सेवा योजना राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजनेमधून गरीब कुटुंबाला वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहे. राज्यात गाव तिथे गोदाम तसेच कापूस, सोयाबीन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५०० रुपये देण्यात येणार आहेत. गाईच्या दुधासाठी पाच रुपयाचे अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे १ जुलैपासून हे अनुदान दिले जाणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

आशा वर्कर, कोतवाल, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका यांच्या वेतनात भरीव वाढ या अतिरिक्त अर्थसंकल्पात करण्यात आली असून सर्वजन हिताय सर्वजन सुखाय अशा प्रकारचा अर्थसंकल्प अजितदादांनी सादर केला आहे. शेतकरी, महिला, युवा, मागासवर्गीय, अल्पसंख्याक अशा सर्व महत्त्वाच्या घटकांना दिलासा देणारा अशा प्रकारचा अर्थसंकल्प आहे. पंतप्रधान मोदींच्या गरीब कल्याणाच्या धोरणाला पुढे नेणारा, निर्धाराला पुढे नेणारा, महाराष्ट्राला पुढे नेणारा अर्थसंकल्प आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

# मोहपाडा येथील अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार

**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

टेम्पोला दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीस्वार उमेश रघुनाथ मोहिते (वय २२, रा. चौक खालापूर) याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दांट आपटा, राज्यमार्गावर मोहपाडा येथे मंगळवारी (दि.२) दुपारी १२ वा.च्या सुमारास घडली.



पराडेहून दांडफाट्याकडे आयशर टेम्पो (डिडी ०३ एल९४५७) हा दांडफाट्याच्या दिशेने जात असताना अचानक उजव्या बाजूला घेऊन ब्रेक मारल्याने मागून येणाऱ्या दुचाकी (एमएच ४६ क्यु ७५९९)वरील चालक उमेश दिनकर मोहिते हा टेम्पोला धडकला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघात झाल्याचे समजताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी टेम्पोचालक चंदनकुमार यादव (वय ३१, रा. ग्राम बल्लोपूर, बिहार) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासिक अंमलदार म्हणून पोसई म्हामूणकर अधिक तपास करीत आहेत.

# उरण येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रामनाथ गायकवाड यांचे निधन

**उरण : वार्ताहर**

येथील ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक रामनाथ सखाराम गायकवाड (९२) यांचे मंगळवारी (दि.२) सकाळी वृद्धत्वाने निधन झाले. गोवा मुक्ती स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या गायकवाड यांना अटकेची शिक्षाही झाली होती. हिरवे गुरुजी यांचे ते निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते.



मंगळवारी शहरातून फुलांनी सजवलेल्या ट्रकवरून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी यांनी शासकीय इतमामात पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली. दरम्यान आमदार महेश बालदी, भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, भूषण पाटील, नरेश रहाळकर, चंद्रकांत ठक्कर, बुरूड समाजाचे रायगड जिल्हाध्यक्ष संदीप नागे, चंद्रकांत ठक्कर, सदानंद गायकवाड, काशिनाथ गायकवाड, अनंत गायकवाड, बुरूड समाजाचे आप्तेष्ट, गायकवाड कुटुंबीयांनी त्यांचे अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# मालमत्ता करासंदर्भात सोसायट्यांमध्ये शिबिर

## आतापर्यंत २०० कोटींचा भरणा; कराच्या सवलतीस ३१ जुलैपर्यंतची मुदतवाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिकेकडून देण्यात आलेली सुधारित बिले नागरिकांना भरणे सोयीचे व्हावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पुन्हा एकदा खारघर मधील २१ सोसायटीमध्ये व कामोठ्यांमधील २० सोसायट्यांमध्ये १ जुलै ते १० जुलै २०२४पर्यंत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ घेऊन कर भरणा करावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.



मागील मालमत्ता कर शिबिराला मालमत्ताधारकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या दरम्यान २९ जून रोजी आजवरचा सर्वांत उच्चांकी म्हणजे १७ कोटीची वसुली झाली. तसेच आत्तापर्यंत एकुण २०० कोटी मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. मालमत्ताधारकांचा हा प्रतिसाद पाहून आता पुन्हा एकदा खारघर व कामोठे येथे विशेष शिबिराचे आयोजन १ जलै ते १० जुलै दरम्यान करण्यात आले आहे. कर भरण्यासाठी दिनांक शनिवार रविवारीदेखील महापालिकेचे मुख्यालय व प्रभाग कार्यालय सुरू असणार आहेत.

ज्या मालमत्ताधारकांना अजूनही मालमत्ता कराची बिले मिळाली नाहीत त्यांनी ऑनलाइन पोर्टल (संकेतस्थळ) किंवा महापालिका कार्यालयास भेट देऊन सुधारित देयक उपलब्ध करून घ्यावे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. याचा लाभ मालमत्ताधारकांनी घ्यावा. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**२०२४-२०२५ वर्षांचा कर भरण्यासाठीची पाच टक्के इतकी सूट देण्यात आली आहे. यास मुदतवाढ देण्यात आली असून आता ३१ जुलैपर्यंत नागरिकांना ही सवलत मिळणार आहे. याशिवाय मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन केल्यास एकूण दोन टक्के इतकी सुट दिली जात असल्याने नागरिकांनी त्वरित कर भरणा करून महापालिकेस सहकारी करावे तसेच पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासास हातभार लावावा.**

**-संतोष वारूळे,**
**उपायुक्त, पनवेल महापालिका**

# मुलीचे अश्लील फोटो व्हायरल; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

ऑबेराय नामक तरुणाने नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत इन्स्टाग्रामवर मैत्री करून तिला अश्लील फोटो पाठविण्यास भाग पाडून तिचे अश्लील फोटो सोशल मीडियावरून व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीविरोधात विनयभंग, पोक्सो तसेच आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकणातील १६ वर्षीय पीडित मुलगी नवीन पनवेल भागात राहण्यास असून, ती सध्या शिक्षण घेत आहे. पीडित मुलीचे सोशल मीडियावर अकाऊंट आहे. याचाच फायदा उचलत गेल्या मे महिन्यात ऑबेराय नामक तरुणाने पीडित मुलीसोबत इन्स्टाग्रामवरून मैत्री केली. त्यानंतर त्याने पीडित मुलीसोबत भावनिक संवाद साधून तिचे अश्लील फोटो पाठवण्यास भाग पाडले. त्यामुळे पीडित मुलीने आपले काही अश्लील फोटो ऑबेराय याला पाठवून दिले होते. ऑबेराय याने पीडित मुलीच्या मात्र त्यानंतर आरोपी इन्स्टाग्राम अकाऊंटवरून तसेच सोशल मीडियावरून तिचा सतत पाठलाग सुरू केला. त्यानंतर त्याने पीडित मुलीचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून तिची बदनामी केली.

या प्रकारानंतर घाबरलेल्या पीडित मुलीने या प्रकाराची माहिती आपल्या पालकांना दिली. पालकांनी तत्काळ खांदेश्वर पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी ऑबेरॉय नामक तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

# पनवेल आरोग्य रत्न पुरस्कार प्रदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर्स डेचे औचित्य साधून सोमवारी (दि. १) पनवेलमधील सेवाव्रती, निष्णात तसेच विख्यात अशा सर्व डॉक्टरांच्या सन्मानार्थ पनवेल आरोग्य रत्न पुरस्कार असा एक सोहळा भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या वतीने आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात पनवेलमधील ख्यातनाम जनरल प्रॅक्टिशनर डॉ. श्रीनिवास वाळींबे, शल्यचिकित्सक डॉ. जगदीशचंद्र घोडके, बालरोगतज्ज्ञ डॉ. मिलिंद नाडकर्णी यांना पनवेल आरोग्य रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पनवेलमधील वेगवेगळ्या विषयांतील प्रविण १६० डॉक्टर्स, पनेवलमधील प्रतिष्ठित नागरीक तसेच भारत विकास परिषदचे सदस्यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा झाला असून १६० डॉक्टर्स ना मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी भारत विकास परिषदेच्या सदस्यांनी सर्व उपस्थित डॉक्टरांच्या मनोरंजनार्थ स्वरचीत मधुमेहावर बोलू काही...या आगळ्या वेगळ्या संगीतमय कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिका उपायुक्त डॉ. वैभव विधाते, भारत विकास परिषदेचे प्रांत अध्यक्ष सिमंत प्रधान, प्रांत सचिव नितीन कानिटकर, पनवेल शाखा अध्यक्षा कीर्ती समुद्र, पनवेल शाखा सचिव पद्मजा कुलकर्णी, कोषाध्यक्ष शितल विचारे, श्यामनाथ पुंडे, शंकर आपटे, समुद्र गांधी, डॉ. शीतल गोडबोले आदी उपस्थित होते.

# रोडपाली विभागात मनपाची स्वच्छता मोहीम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका केंद्रशासित व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मंगळवारी (दि. २) रोडपाली विभागाच्या सेक्टर १२ श्री म्हसोबा तलाव येथे सफाई अपनाओ बिमारी भगाओ अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमामध्ये प्रभाग क्र. ७चे स्वच्छता दुत कळंबोली पोलीस वाहतूक विभागाचे अधिकारी (एएसआय) सतीश शिरोडे, रवी पाटील सामाजिक संस्था तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्यामार्फत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. त्यावेळी पाहणी करितावेळी प्रभाग समिती ब चे आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे साहेब स्व निरीक्षक हरेश कांबळे अमित जाधव व सुपरवायजर हर्षद पाटील, प्रणित पवार, नागरिक व स्वच्छता दुत उपस्थित होते. दरम्यान, या अभियानांतर्गत पनवेल मनप क्षेत्रात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

# मोठी जुई येथील तब्बल ४०० वर्ष जुने पिंपळाचे झाड कोसळले

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील मोठीजुई गावात मोठ्या मनाचे ठीसूळ दगडावर वसलेले जुन्या रूढी परंपरा जपणार ईश्वर प्रेमी गाव अशी ओळख असणाऱ्या मोठीजुई गावची साक्ष देणारा ४०० वर्षापूर्वीचे जुने असलेले पिंपळाचे झाड कोसळल्याची घटना काल रात्री घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र झाडाखाली उभ्या असलेल्या काही वाहनांचे आणि दुकानांचे नुकसान झाले आहे.

हे झाड गावची एक वेगळी ओळख असल्याने ही बातमी कानावर पडताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव





घेत पडलेल्या झाडाची अवस्था बघून दुःख व्यक्त केले, आणि ह्याच जागेवर पुन्हा पिंपळाचेच झाड लावण्याचा निर्धार व्यक्त केला. हे झाड पडल्याने गावातील ये-जा करणाऱ्या वाहनांची रहदारी ठप्प झाली आहे. या सोबत मोठीजुई गावातील बहुतेक ठिकाणी लाईटचे खांबदेखील पडले असल्याने गावातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे, लाईटचे खांब त्वरित लावून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची जनतेतून मागणी होत आहे.

मध्यरात्रीच्या वेळी ही घटना घडल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. झाडाच्या आजूबाजूला काँक्रीटीकरणामुळे झाडाच्या मुळाची पकड सैल झाली होती आणि रात्री खूप जोराचा वारा होता त्यामुळे हे महाकाय जुने झाड कोसळले, मात्र कित्तेक वर्षे आम्हाला ऑक्सिजन देणारे आमचा आधार गेला आहे. तसेच आमचा प्राण गमावल्याची भावना मोठीजुई गावचे रहिवासी व्यक्त करीत आहेत.



**पनवेल : सुकापूर येथील भाजपचे युवा कार्यकर्ते रूपेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते प्रल्हाद केणी, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, महेश पाटील, राजेश पाटील, राहुल पोपेटा, आत्माराम पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : रामशेठ ठाकूर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष व खारघर राधाकृष्ण सोसायटी सेक्टर ११चे सदस्य प्रकाश फटक यांचा ७५वा वाढदिवस सोसायटीच्या वतीने उत्साहात करण्यात आला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सोसायटीचे सचिव मनोज कहार, प्रकाश फटक यांचा मुलगा राकेश फटक, सून रिया फटक आणि राधाकृष्ण सोसायटीचे सर्व सदस्य उपस्थित होते.**

# चिवण्या मासे खरेदीसाठी खवय्यांची गर्दी

**उरण : वार्ताहर**

पावळ्यात खाडीकिनारी चिवणी मासे मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. चिवण्या बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने खवय्ये आनंदी झाले आहेत. सध्या २०० ते ५०० रुपये वाटा मिळत आहेत. विविध ठिकाणी हे दर कमी-अधिक आहेत. उरण तालुक्यातील सिडको फाटा येथे डोंगरी, पाणजे, नवीन शेवा येथून मच्छी विक्रेते चिवण्या विकावयास येत असतात. त्याच प्रमाणे उरण शहरातील कोट नाका, उरण चारफाटा येथेही चिवणी मच्छी मिळतात. खरेदी करण्यास खूपच गर्दी असते.

खाडीच्या मुखाच्या भागात चिवण्या अधिक प्रमाणात सापडतात, मात्र खाडीकिनारी प्रदूषित झाल्याने चिवण्यांचे प्रमाण





घटले आहे. खाडीकिनारी हे मासे अंडी घालतात. पावसाच्या सुरुवातीला गाबोळी म्हणजेच पोटात अंडी असलेल्या दिवण्या अधिक सापडतात. अशा वेळी मासेमार व स्थानिक मोठ्या प्रमाणात चिवण्या पकडतात. सध्या या चिवणी माशांची आवक वाढली आहे. त्यामुळे खवय्ये आनंदी आहेत.

**हंगामातील पहिलेच विवणी मासे असल्याने मागणी खूप आहे. खवय्ये खरेदीसाठी तुटून पडत आहेत. काही दिवसांनी पाऊस सुरू झाल्यावर आवक वाढल्यानंतर चिवण्या स्वस्त होतील. या माशांच्या अंड्यांना मोठी मागणी असते. गाभोळी चिवणीला भाव जास्त मिळतो किंमतही चांगली मिळते.**

**-किशोर घरत, नवीन शेवा (उरण), मासळी विक्रेत्या**

**चिवणी मासे खूप चविष्ट असतात. या मोसमात मिळणारे विवणी मासे आवर्जुन खातो. स्वतः जाळे घेऊन मासे पकडायला जातो. वलगणीतदेखील सापडतात.**

**-निर्मला घरत, सावरखार (उरण), खवय्ये**

### वैशिष्ट्यपूर्ण अशी रचना

चिवणीची त्वचा अतिशय चिकट व तेलकट असते. त्यामुळे तो हातात धरताना सटकतो. या माशाच्या डोक्याजवळ टणक अणकुचीदार काटा असतो. त्यामुळे मासा सांभाळून पकडावा लागतो. त्याचा काटा टोचल्यास इजा होते. त्यामुळे ह्या माशाबाबत ज्यांना माहित आहे, तेच लोक खरेदी करतात.

### साफ करण्याची खास कला

प्रत्येक मासा साफ करण्याची वेगळी पद्धत असते, तशीच चिवणी हा मासा साफ करण्यासाठी चुलीतील राख वापरतात. ती नसेल तर तांदळाचे पीठ वापरतात. डोक्याजवळील काटा हातात राखाडी घेऊन मोडावा लागतो. काहीजण तो सुरी किंवा विळीने कापून टाकतात.

# 'लायन्स'तर्फे शिरढोण येथे आरोग्य, नेत्रतपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम आणि रिजन ३ मधील सर्व क्लबच्या वतीने शिरढोण येथील वासुदेव बळवंत फडके हायस्कूल येथे भव्य आरोग्य आणि नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रांतपाल एन आर परमेश्वरन तसेच विशेष अतिथी म्हणून विजय गणात्रा, ए एस एन मूर्ती उपस्थित होते. या शिबिराचा ३१५ विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी यांनी लाभ घेतला. २२ जणांना चष्मे देण्यात आले. आरोग्य तपासणीसाठी अपोलो हॉस्पिटलची टीम तर नेत्र तपासणीसाठी लुईस कोलासो आणि निक्सन कोलासो यांनी सहकार्य केले. या शिबिरासाठी रिजन चेअरमन सुयोग पेंडसे, झोन चेअरमन अलकेश शहा, संजय गोडसे, मिलिंद पाटील, नयन कवळे, पनवेल सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित, सचिव प्रेमेंद्र बहिरा, आदित्य दोशी उलवे जेम्स क्लबचे उमेश जाधव उपस्थित होते.

हे शिबिर यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुर्यवंशी सर आणि सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.



## संपादकीय

# मोदींचे सडेतोड उत्तर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर झालेल्या आभार प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना विरोधीपक्षांवर जोरदार हल्ला चढवला. 'बालिश चाळे', 'परजीवी पक्ष' अशा शब्दांत मोदींनी राहुल गांधी यांना तसेच काँग्रेस पक्षालाही सडेतोड उत्तर दिले हे मान्य करावेच लागेल.

**आभार प्रस्तावावरील चर्चेदरम्यान सोमवारी लोकसभेत सत्ताधारी सदस्य आणि विरोधक यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली होती. या वेळी विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांच्या सरकारची धोरणे व भारतीय जनता पक्ष यांच्यावर हल्लाबोल केला होता. राहुल गांधी यांनी या वेळी देवतांच्या तसबिरी सभागृहात आणून आपल्या भाषणादरम्यान त्या उंचावून दाखवल्या. राहुल यांनी आपल्या भाषणांत केलेला हिंदुंचा 'हिंसक' असा उल्लेख खटकल्याने पक्षाच्या अनेक खासदारांनी त्यांचा निषेध केला. महादेव, प्रेषित मोहम्मद, येशू ख्रिस्त, गुरू नानक अशा विविध धर्मातील देवांच्या व प्रेषितांच्या तसवीरी उंचावत, या सगळ्यांनी घाबरू नका, दुसऱ्याला भीती दाखवू नका अशी शिकवण दिली होती असे राहुल गांधी या वेळी म्हणाले व स्वत:ला हिंदू म्हणवणारे भाजपवाले देशभर हिंसा आणि द्वेष पसरवित आहेत, अशी टीका त्यांनी केली, परंतु त्यांच्या या भाषणादरम्यान पंतप्रधान मोदी तसेच नऊ ज्येष्ठ मंत्र्यांनी हस्तक्षेप करीत वेळीच प्रत्युत्तरही दिले. संपूर्ण हिंदू समाजाला अशा तऱ्हेने हिंसक म्हणणे ही गंभीर गोष्ट असल्याचे सांगत लोकसभाध्यक्षांचे लक्ष वेधले. लोकसभाध्यक्षांनीही त्यांना नियमपुस्तिका दाखवत सभागृहाचे नियम पाळण्याचा सल्ला दिला. वास्तवत: विरोधीपक्ष नेतेपद स्वीकारल्यानंतर आता राहुल गांधींची जबाबदारी वाढली आहे. यापूर्वीच्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला सत्ता तर दूरच, जनतेने विरोधीपक्षाचा दर्जाही दिला नव्हता, पण या वेळी ९९ जागा मिळाल्यामुळे काँग्रेस पक्षाला विरोधीपक्ष नेतेपद मिळणार हे निश्चित होते. आता १८ व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाल्यावर राहुल गांधींनी कथित आक्रमकपणाचा आव आणला असला तरी त्यांना सभागृहाचे गांभीर्य समजून घ्यावे लागणार आहे. विरोधीपक्ष नेते म्हणून त्यांनी सरकारच्या धोरणांमधील चुकांवर बोलणे अपेक्षित आहे, परंतु टीका करताना त्यांना त्यांचे बोलणे तर्कसंगत ठेवण्यावर लक्ष द्यावे लागेल. स्वत:च्याच पक्षाला अडचणीत आणणारी विधाने त्यांनी यापूर्वी अनेकदा केली आहेत. सोमवारच्या त्यांच्या आक्रस्ताळ्या भाषणावर भाजप खासदार कंगना राणावत यांना सहजच 'हा स्टँड अप कॉमेडीचा चांगला नमुना होता' अशी टीका करता आली आहे. राहुल गांधी ही अशी संधी आपल्या हास्यास्पद विधानांतून नेहमीच उपलब्ध करून देत आले आहेत. आता विरोधीपक्ष नेतेपद हातात आल्यानंतर तरी त्यांची कार्यशैली अधिक गंभीर होणार आहे का हा प्रश्नच आहे. पंतप्रधान मोदी यांनीही मंगळवारी राहुल गांधी यांचे नाव न घेता, लोकसभेने काल बालिश चाळे पाहिले अशी टीका केली. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी आपल्या डायलॉगबाजीत 'शोले' सिनेमालाही मागे टाकले आहे. तिसऱ्यांदा हरलेला, १३ राज्यांमध्ये शून्य जागा मिळालेला हा पक्ष खोट्या विजयाचे सेलिब्रेशन करतो आहे, पण वास्तवत: त्यांनी देशाने दिलेल्या जनादेशाचा अर्थ प्रामाणिकपणे समजून घेण्याची गरज आहे. सहकारी पक्षांची मते खाणारा काँग्रेस पक्ष हा आता परजीवी पक्ष बनला आहे, असा जोरदार प्रतिहल्ला चढवित मोदींनी राहुल गांधींच्या सोमवारच्या टीकेला सडेतोड उत्तर दिले हे मान्य करावेच लागेल.**

# माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध अमुचे सुरू...

**खबरबात**
**नितीन देशमुख**

माणुसकीच्या शत्रूसंगे युध्द अमुचे सुरू... युध्द अमुचे सुरू. गाणे जोर जोरात बाहेर मंडपात स्पीकरवर वाजत होते. त्याचवेळी लोकपरिषदेच्या पर्यवेक्षिका मनीषा अश्रुभरल्या डोळ्यांनी त्या कोवळ्या कळीची दु:खभरी कहाणी सांगत होत्या. दिल्लीजवळील खेड्यात एका गरीब कुटुंबात तिचा जन्म झाला. घरात अठराविश्वे दारिद्र्य एका झोपडपट्टीत आपल्या आई-वडील व भावंडांसह ती रहात होती. एक दिवस मध्यरात्री झोपडीला लागलेल्या आगीत संपूर्ण कुटुंब जळून जाते. एक छोटी अवघ्या १२ वर्षांची मुलगी वाचते. तिचा सांभाळ कोण करणार प्रश्न निर्माण होतो. गाव पंचायत बसते तिच्या नातेवाईकांना बोलावून तिची जबाबदारी घेण्यास कोण तयार आहे, विचारतात कोणीच तयार होत नाही अखेर पंचायत तिचा ताबा मामाला देते. मामा तिला घेऊन घरी येतो. त्याच्यातील पशू जागा होतो, रात्रभर निष्पाप बालिकेवर बलात्कार करतो. सकाळी तिला शहरात नेऊन कोठीवर मालकिणीला विकतो.

खेळा-बागडायच्या वयात मुलगी कोठीवर येते. तिला मुंबई, पुण्यासारख्या शहरात विकले जाते. कोवळी मुलगी म्हणून तिला चांगला भाव मिळतो मालकीण पैसे वसूल करण्यासाठी दिवसभर तिला गिऱ्हाईक घ्यायला लावते. त्या कोवळ्या कळीची दुरावस्था पाहून तेथील इतर मुलींना वाईट वाटते त्या कोठीवालीला विनंती करतात, पण दिलेले पैसे वसूल करायचे असल्याने कोठीवाली तिला सोडत नाही. एक दिवस रात्री पोलिसांची रेड पडते. कोठीवाली मुलगी लहान असल्याने आपण कायद्याच्या कचाट्यात अडकायला नको म्हणून आपल्या माणसांना तिला मोटरसायकलवर बसवून जंगलात सोडायला सांगते. मध्यरात्री भयाण काळोखातून वाट शोधत मुलगी रस्त्यावर येते गाड्यांना हात करते एक ट्रक थांबतो. तो ट्रकचालकही तिच्यावर बलात्कार करतो आणि तिला पुन्हा त्याच वस्तीवर आणून सोडतो. तिची अवस्था पाहून तेथील एका मुलीला तिची दया येते. ती मालकिणीला तिचे पैसे फिटेपर्यंत आपण तुझ्याकडे येऊ पण तिला सोड सांगते. मालकीण ही तयार होते, पण तोपर्यंत त्या मुलीला भयानक रोगांची लागण झालेली असते तिचे आयुष्य बरबाद झालेले असते.

आपण कोणता जन्म घ्यायचा, कोठे घ्यायचा हे कोणाचे हातात नसते. माणूस जन्माला येताना सटवाई त्याचे नशीब लिहिते असे म्हणतात. काही माणसे तोंडात सोन्याचा चमचा घेऊन येतात काही दारिद्र्यात जन्म घेतात. पनवेलमध्ये साडेचार हजारांपेक्षा जास्त मुली आज नरक यातना भोगत आहेत. त्यांना या नरकातून बाहेर यायचे आहे. पनवेलमधील काही जणींनी लोकपरिषदेच्या माध्यमातून यातून बाहेर पडण्यासाठी दुकान सुरू केले होते. माध्यमातील अतिउत्साहींनी शरीर विक्रय करणाऱ्या महिलांचे दुकान म्हणून बातमी प्रसिध्द केल्याने समाजातील ढोंगी लोकांनी त्यांना त्रास देऊन दुकान बंद करण्यास भाग पाडले. परिस्थितीमुळे या धंद्यात आलेल्या महिला नरकातून बाहेर पडत असताना त्यांना तुच्छतेची वागणूक देणारे समाजातील हे प्रतिष्ठित रात्री बार मध्ये जाऊन 'पिया, तू अब..तो आ..जा, आ..जा' म्हणत नाचत त्यांच्यावर पैसे उडवतात. त्यांच्या बरोबर मजा करतात त्यावेळी मात्र ह्या त्यांच्या दिलरुबा असतात, पण त्यांनी या नरकातून बाहेर पडावे, अशी यांची इच्छा नसते.

अरे, तुम्ही यांच्याबरोबर काम करता म्हणून नाक मुरडणारी किंवा या मुलींना रेशन कार्ड देता येणार नाही कारण यांच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल आहे सांगणारी अथवा तुम्ही कशाला बचत गट नोंदणी करता, तुम्हाला नवीन व्यवसाय कसा जमेल, असे बोलून त्यांचे मनोधैर्यखच्ची करणाऱ्या अधिकाऱ्यांची किव करावीशी वाटते. शासनाचे आदेश असतानाही यांना रेशन कार्ड देण्यास अधिकारी तयार नाहीत. वेगवेगळी कारण देतात. काय तर पिठा कायद्याखाली गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल असलेल्यांना रेशन कार्ड द्यायचे नाही मग देशातील किती कार्ड रद्द होतील. या परिस्थितीने गांजलेल्या दुर्दैवी महिलांवर उपचारासाठी औषधाला शासनाकडे पैसा नाही. दगडाला ही पाझर फुटेल, पण शासनाच्या खुर्चीची उब घेणाऱ्या अधिकाऱ्याला मग ती महिला का असे ना पाझर फुटणार नाही हेच खरे.. शासन तर सोडाच समाजातील कोणी ही त्यासाठी मदत करायला तयार नाही. त्या ही अखेर माणूस आहेत. त्यांना ही मन आहे याची जाणीव होत नसल्याने आज ही माणुसकीच्या शत्रू संगे, युध्द अमुचे सुरू...असे म्हणण्याची वेळ आपल्यावर आली आहे.

# भारतीय क्रिकेटर हरभजन सिंग



जलंधरमध्ये जन्मलेला हरभजन हा त्याच्या पाच बहिणींचा एकुलता भाऊ होता. त्यामुळे त्याने एकवेळेला कॅनडाला ट्रक ड्राईव्हरची नोकरी करण्याचा विचार केला होता. पण त्याने क्रिकेटला जास्त प्राधान्य दिले.

सुरुवातीला हरभजनने फलंदाजी प्रशिक्षण घेतले. चंद्रजीत सिंग हे त्याचे फलंदाजी प्रशिक्षक होते. पुढे देविंद्र अरोरा यांच्या प्रशिक्षणाने तो फिरकीपटू बनला. हरभजनला भारताचे माजी क्रिकेटपटू नयन मोंगिया यांनी भज्जी हे टोपणनाव दिले होते. हरभजनची वयाच्या १५व्या वर्षी १९९५-९५मध्ये १६ वर्षांखालील पंजाब संघात निवड झाली होती. या वेळी हरियाणाविरुद्ध त्याने पहिल्या डावात ७/४६ आणि दुसऱ्या डावात ५/१३८ अशी कामगिरी केली होती. त्यापुढील हिमाचल प्रदेशविरुद्धच्या सामन्यात त्याने ७९ धावा देत ११ विकेट्स घेतल्या होत्या. तसेच दिल्लीविरुद्ध ५६ धावांची खेळीही केली होती. १९९८साली वयाच्या १८व्या वर्षी हरभजनने वनडे आणि कसोटीत पदार्पण केले होते. १९९८ साली त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या पहिल्या कसोटी सामन्यात २ विकेट्स घेतल्या होत्या.

२०००मध्ये त्याच्या वडिलांचे निधन झाल्याने घरची जबाबदारी हरभजनवरती पडली होती. २००१मध्ये त्याने त्याच्या ३ बहीणिंचे लग्न केले. २००१मध्ये जेव्हा अनिल कुंबळेला दुखापत झाल्याने हरभजनची बॉर्डर गावसकर ट्रॉफीत निवड झाली होती. यावेळी तो ३२ विकेट्स घेत संपूर्ण कसोटी मालिकेत सर्वाधिक विकेट्स घेणारा फिरकीपटू ठरला तसेच तो कसोटीत हॅटट्रीक घेणारा पहिला भारतीय गोलंदाजही ठरला. त्याची कामगिरी पाहून २००२ला पंजाब सरकारने त्याला मानद पंजाब पोलीस उपअधीक्षकपद बहाल केले. त्यावेळीचे पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाश सिंग बादल यांनी त्याला 'पंजाब का पुत्तर' असे नावही दिले.

२००३साली त्याच्या क्रिकेटमधील कामगिरीने त्याला अजुर्न पुरस्कार प्राप्त झाला. तसेच, २००९मध्ये तो पद्मश्री पुरस्काराचाही मानकरी ठरला. ३ जुलै रोजी जन्मलेल्या हरभजनचा ३ हा लकी नंबर होता. मग भारताकडून असो किंवा मुंबई इंडियन्सकडून तो खेळताना तिसऱ्या क्रमांकाची जर्सी घालायचा. आयपीएल कारकार्दीत हरभजनने मुंबई इंडियन्सकडून खेळताना एकूण १४७ विकेट्स घेतल्या आहेत. यामुळे तो मुंबईकडून सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. २००८मध्ये त्याने मुंबई इंडियन्सकडून त्याच्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात केली आणि २०१७पर्यंत तो मुंबईकडून खेळला. तर, २०१९च्या हंगामात चेन्नई सुपर किंग्सने त्याला २ कोटींना विकत घेतले. २००८मध्ये हरभजनला आयसीससीने निलंबीत केले होते. त्याचवर्षी त्याला अँन्ड्रयू सिमंड्सचा अपमान केल्यामुळे दंडही ठोठावण्यात आला होता. तसेच, एस श्रीशांतला आयपीएलमध्ये चापट मारल्याप्रकरणी बंदी घालण्यात आली होती.

जुलै २०११मध्ये वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू कार्लटन बॉग याला बाद करत हरभजनने सर्वात युवा वयात कसोटीतील त्याच्या ४०० विकेट्स पूर्ण केल्या. कसोटीच्या इतिहासात त्याच्याव्यतिरिक्त मुथय्या मुरलीधरनने हा पराक्रम केला आहे. २९ ऑक्टोबर २०१५ला हरभजनने त्याची प्रेमिका गीता बासराशी लग्न केले. त्यांना हिनाया हीर ही मुलगी आहे व जोवन वीर सिंग प्लाहा हा मुलगा आहे.

२०१७च्या इंग्लंडविरुद्धच्या चॅम्पियन्स ट्रॉफीत त्याला खेळण्याची संधी मिळाली नव्हती. पुढे त्याने २०१९च्या विश्वचषकात समालोचन केले. तसेच तो २०२१ नंतर आयपीएलमध्येही सहभागी झालेला नाही.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# जिओ ५जीसाठी भन्नाट ट्रिक; १२०० ते १६०० रुपये वाचणार



जिओचे फाईव्ह जी अनलिमिटेड वापरायचे असल्यास आधी २३९ रुपयांचे रिचार्ज करावे लागत होते. आता त्यासाठी २ जीबी दर दिवसा ही महत्वाची अट आहे, यानुसार अनलिमिटेड इंटरनेटसाठी ३४९ रुपये महिन्याला म्हणजेच २८ दिवसांसाठी मोजावे लागणार आहेत.

रिलायन्स जिओने रिचार्जची दरवाढ ३ जुलैपासून लागू होणार आहे. जिओ धारकांसाठी एक ट्रिक आणली आहे जी तुमचे तब्बल १६०० रुपये वाचविणार आहे. जिओचे फाईव्ह जी अनलिमिटेड वापरायचे असल्यास आधी २३९ रुपयांचे रिचार्ज करावे लागत होते. आता त्यासाठी २ जीबी दर दिवसा ही महत्वाची अट आहे, यानुसार अनलिमिटेड इंटरनेटसाठी ३४९ रुपये महिन्याला म्हणजेच २८ दिवसांसाठी मोजावे लागणार आहेत. यानुसार ३६५ दिवसांसाठी तुम्हाला ४,५४९.४६ रुपये मोजावे लागणार आहेत.

वर्षाला एकाचा ४,५४९ रुपये खर्च, मग जर तुमच्या पत्नीकडे, आई, वडिलांकडे, मुलांकडेही मोबाईल असेल तर काय? मोबाईल वापरायचा खर्च कितीला पडेल? आमच्या कॅल्क्युलेशनुसार जर तुमचे १२०० ते १६०० रुपये वर्षाचे वाचवू शकणार आहात.

जिओने ३३६ दिवसांचा २५४५ रुपयांचा प्लॅन बंद केला आहे. आता ३ जुलैनंतर ३६५ दिवसांचा ३५९९ रुपयांचा प्लॅन उपलब्ध होणार आहे. आधीचा २९९९ रुपयांचाच हा प्लॅन आहे. आता जर तुम्ही ३ जुलैच्या आत आधीच्या किंमतीत हे दोन प्लॅन घेतले तर त्यानुसार तुम्हाला फायदा चालू राहणार की बंद होणार असा प्रश्न निर्माण झाला होता.

जिओनुसार सध्या तुम्ही २३९ किंवा तत्सम वार्षिक प्लॅन घेतला असेल व तो लवकरच संपणार असेल तर तुम्ही ३ जुलैपर्यंत जुना प्लॅन खरेदी करू शकता. त्याचे फायदे त्या प्लॅनची व्हॅलिडिटी संपेपर्यंत चालू राहणार आहेत. म्हणजेच जर तुमचा प्लॅन ३ जुलैनंतर संपत असेल तर तुम्ही आता २५४५ रुपयांचा किंवा २९९९ रुपयांचा प्लॅन घेऊन ठेवू शकता.

हा प्लॅन तुमचा आधीचा प्लॅन संपल्यानंतर अॅक्टीव्हेट होईल व जरी दर दिवसाला १.५ जीबी डेटा असला तरीही तुम्हाला वर्षभर अनलिमिटेड ५जी डेटा मिळत राहिल. एअरटेलनेही हे स्पष्ट केले आहे. यानुसार जर तुम्ही आताचे प्लॅन घेऊन ठेवले तर तुमचे वर्षाला १२०० रुपये ते १६०० रुपये वाचू शकणार आहेत. पुढील वर्षी हीच वाचलेली रक्कम तुम्ही रिन्यू करण्यासाठी वापरू शकणार आहात.

# इतिहासकार, नाटककार दत्तात्रय गोडसे



## निमित्त

दत्तात्रय गणेश गोडसे हे इतिहासकार, नाटककार, चित्रकार, नेपथ्यकार, लेखक, कला समीक्षक व १९८८चे संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते होते. त्यांनी वि.का. राजवाडे, म.वि धोंड यांना अनुसरून फक्त मराठी भाषेत लेखन केले.

द.ग.गोडसे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील वाघोडे येथे ३ जुलै इ.स. १९१४ रोजी झाला. त्यांनी शालेय शिक्षण सावनेरला, आणि कॉलेज शिक्षण नागपूरच्या मॉरिस आणि नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजातून घेतले. त्यांनी लंडन विद्यापीठाच्या 'स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्ट'मधून ललितकलेचे प्रशिक्षणही घेतले.

गोडसे यांनी मराठीत अनेक विषयांवर लिखाण केले. शिवाजी-मस्तानी-रामदास या ऐतिहासिक व्यक्तींवर, मराठी वाङ्मय-नाटकांवर, चित्रकला-शिल्पकला-वास्तुकलांवर आणि अगदी बुद्धकालीन स्थापत्यावर गोडसे लिहीत असत. थॉमस डॅनियल ने इ.स. १७९० साली पेशव्यांच्या दरबाराचे एक रंगचित्र काढले होते. त्यावरही गोडसेंनी एक लेख लिहिला होता. त्यांचा मराठी चित्रकार दीनानाथ दलाल यांच्यावर लिहिलेला भारलेल्या जगातून आलेला अलौकिक माणूस हा लेख अतिशय गाजला होता. ना.सं. इनामदार यांनी 'राऊ' ही कादंबरी लिहिताना द.ग. गोडसे यांची खूप मदत झाली, असे त्या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. द.ग. गोडसे यांनी आपल्या चित्रांनी अनेक मासिके आणि पुस्तके सजवली. १०७हून अधिक नाटकांचे ते नेपथकार होते. तीन मराठी आणि दोन हिंदी चित्रपटांचे ते कलादिग्दर्शकही होते.

साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील घटना, ढोंगबाजी, गटबाजी, मक्तेदारी, भाषेचा-आशयाचा बोजडपणा, नावीन्याच्या आणि प्रयोगशीलतेच्या नावाखाली चाललेला भोंगळपणा हे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या या 'वाद-संवादा'चे विषय असत. वृत्ती-प्रवृत्तींवर टीका केली जाई आणि ती व्यक्तिगत पातळीवर घसरणार नाही, याची काळजीही घेतली जाई. शमा आणि निषाद म्हणजे अनुक्रमे द.ग.गोडसे आणि मं.वि. राजाध्यक्ष यांनी हे चुरचुरीत आणि पौष्टिक सदर जवळजवळ नऊ वर्षे चालवले. त्या काळात या सदरावर अनेकांचा रोषही ओढवला, पण अशी वृत्तिलक्ष्यी टीका वाचण्याची सवय वाचकांना लागली. 'टवाळा आवडे विनोद' या वचनाला छेद देणारे लेखन द.ग. गोडसे यांनी या सदरात सातत्याने केले.

१९४३ ते ५३ या वर्षांतील या सदरांचे निवडक संकलन वाद-संवाद (निषाद आणि शमा) याच नावाने प्रसिद्ध झाले आहे. तात्कालिक लेखन वगळून आजही प्रस्तुत वाटेल, असे लेख यात घेतल्याचे संपादकांनी म्हटले आहे. 'मुद्रणसाक्षेप' किंवा 'पदवी आणि प्रबंध' असे लेख याची उत्तम उदाहरणे आहेत.

द.ग. गोडसे यांच्याविषयी वाङ्मयशास्त्रविद्, भाषाशास्त्री आणि चिन्हाभ्यासशास्त्रतज्ज्ञ अशोक रामचंद्र केळकर यांनी लिहिले आहे, 'गोडसे यांचे कलेच्या इतिहाससंबंधीचे लिखाण क्वचित विवाद्य असले तरी जीववादाच्या दृष्टिकोनातून अतिशय मोलाचे आहे. गोडसे यांनी केवळ मराठीतच लिहिण्याचे जे ठरविले, त्यामुळे मराठी वाचकांना अपरिमित लाभ झाला आहे. ५ जानेवारी, इ.स. १९९२ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**


## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : पावसामुळे शेतकरीवर्ग सुखावला असून शेतीच्या कामासाठी लगबग सुरू झाली असली तरी तालुक्यात क्षणात ऊन आणि क्षणात पावसाच्या लहरीपणामुळे शेतातील राब पावसाअभावी सुकतात की काय, अशी भीती व्यक्त होत असून शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

## आरोग्य प्रहर

# शेवग्याची पाने खाल्ल्याने शरीरात होतात चांगले बदल



शेवग्याची पाने सकाळी चावून खाल्ल्याने शरीराला चांगला फायदा होतो. काही जण शेवग्याच्या शेवग्यांच्या शेंगा खातात परंतू शेवग्याच्या पानांचीदेखील चांगली भाजी होते. शेवग्यांच्या या पानांमुळे शरीराला चांगला फायदा होतो. शेवग्यांची पाने नियमित खाल्ल्याने तुम्हाला निरोगी आणि उत्साही जीवन जगायला मदत होते. चला तर पाहूयात शेवग्यांच्या पानामुळे शरीराला नेमके काय-काय फायदे होतात...

✽ शेवग्यांच्या पानात विटामिन्स ए,सी,ई, आणि बी-कॉम्प्लेक्स, कॅल्शियम, पोटॅशियम, प्रोटीन आणि फायबरचे प्रमाण जास्त प्रमाणात असते. नियमित सेवनाने आपल्या शरीराला पोषक तत्व मिळतात आणि आरोग्य चांगले रहाते.

✽ शेवग्याच्या पानात एंटी ऑक्सीडेंट तत्वांचा खजाना आहे. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीत वाढ होते. तसेच शरीर आजारांचा योग्य प्रकारे सामना करू शकते.

✽ शेवग्याची पाने सकाळी उपाशी पोटी चावून खाल्ल्यास रक्तदाबावर नियंत्रण राहाण्यास मदत मिळते. यातील पोटॅशियम आणि मॅग्नेशियम हृदयाच्या ठोक्यांना नियंत्रित करण्यास सहायक ठरते. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

✽ शेवग्याच्या पानात फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे पचनयंत्रणा देखील चांगली रहाते. यामुळे बद्धकोष्ठता देखील दूर रहाते, अन्य पचनासंदर्भातील आजारही दूर होतात.

✽ या पानात विटामिन्स ए आणि ईचे प्रमाण जादा असते. त्यामुळे त्वचा आणि केसांचे आरोग्य चांगले होते. त्वचेला सुरुकत्या होण्याचे प्रमाण देखील कमी होते.

✽ शेवग्याच्या पाने मेटाबॉलिझ्म वाढविण्यास मदत करतात,ज्यामुळे वजन नियंत्रणात राहाते. याच्या सेवनामुळे भूक कमी होते. आणि शरीरातील ऊर्जा वाढते.

✽ शेवग्यांच्या पाने खाल्ल्याने ब्लड शुगरची पातळी नियंत्रणात राहाते. त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना ही पाने चघळल्याने फायदा होतो.

✽ मानसिक आरोग्यासाठी देखील ही पाने चांगली असतात. यातील तत्वे तणाव आणि चिंता दूर करतात.

✽ यातील एंटीऑक्सीडेंट घटकांमुळे शरीरातील फ्रि रेडीकल्सशी लढण्यास मदत करते. हे शरीराला डिटॉक्सिफाय करते. अनेक रोगांचा बचाव करते.

**(ही माहिती सर्वसामान्य ज्ञानावर आधारीत आहे. योग्य सल्ल्यासाठी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.)**

# रायगडात स्टॉप डायरिया अभियान राबविणार

## राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांची माहिती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शुद्ध, स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, जलजीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांचा उद्देश आहे. जलजन्य आजार रोखण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १ जुलै ते ३१ ऑगस्ट या कालावधीत स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली आहे.

या अभियानामध्ये गावातील अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र, सरकारी कार्यालये व प्राथमिक शाळा येथील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया, गॅस्ट्रो व काविळ यांसारखे अनेक आजार होत असतात. त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येणार आहे. यासाठी गावस्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. एकूण आठ आठवडे हे अभियान चालणार असून प्रत्येक आठवड्यात वेगवेगळे उपक्रम गाव पातळीवर घेण्यात येणार आहेत.

पाणी शुद्ध करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात येणार आहे व शुद्ध पाण्याचे महत्त्व सांगण्यात येणार आहे. या अभियानामध्ये मुख्यतः पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन व त्याची योग्य हाताळणी, स्वच्छता जागृती कार्यक्रम, पाणीगळतीच्या जागा शोधून त्याची दुरूस्ती करणे, पाणी तपासणीबाबत गावपातळीवर पोस्टर बॅनर्स लावणेत येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाळा, अंगणवाड्या प्राथमिक आरोग्यकेंद्रे येथे स्वच्छता जागृती कार्यक्रम घेणेत येणार आहे. ग्रामस्थांमध्ये कचऱ्याच्या वर्गीकरणाबाबतीत जागृती निर्माण करणे यासाठी घरोघरी भेटी देऊन, कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास प्रोत्साहन देणे याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

अंगणवाड्यामध्ये माता व किशोरी मुलींची स्वच्छता आरोग्य इत्यादी विषयावर मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा योजनेतील पाणी गळती शोधून त्याची दुरूस्ती करणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणे, घरगुती स्तरावरील पाणी साठवणुकीच्या टाक्यांची स्वच्छता करणे, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी नादुरूस्त शौचालयांची दुरूस्ती करणे तसेच गावामध्ये ग्रे वॉटर मॅनेजमेंट बाबत विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये विशेष करून प्रत्येक सेप्टिक टँक असलेल्या शौचालयांना शोषखड्डा तयार करणे घरातील सांडपाणी परसबाग किंवा शोषखड्डा करून त्यातच सोडणे हे उपक्रम राबवण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याचे स्रोतांची स्वच्छता ठेवणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता याबाबत गावांना सक्षम करण्यासाठी गावातील सर्व घटकांचा या अभियानामध्ये सहभाग घेण्यात येणार आहे.

छतावरील पाऊस पाणी संकलन करून पावसाचे पाणी साठवण्याच्या तंत्राबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका यांना सुरक्षित पाणी वापराच्या महत्त्व याबाबत रॅली, पोस्टर, पथनाट्ये तसेच घरोघरी जाऊन पत्रकांचे वाटप यांच्यामार्फत जनजागृती करण्यात येणार आहे. पाणी गुणवत्ताविषयक माहितीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून घराघरांत पिण्याचे शुद्ध व मुबलक पाणी उपलब्ध होईल, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावाने या अभियानात सहभाग घेऊन अभियान यशस्वीपणे राबविण्यात यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

## नेरळमधून जनावरे चोरून नेणारे पोलिसांच्या ताब्यात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नेरळ परिसरातील माले गावात राहणारे गोपाळ लक्ष्मण वेहेले (वय ५५, रा.माले) यांचे घराचे मागे माळरानातील मोकळ्या जागेत चरण्यासाठी सोडलेले तीन बैल चोरट्यांनी चोरून नेले. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे बैल चोरणाऱ्या चौघांना पोलिसांनी सोमवारी (दि.१) अटक केली आहे. मांसविक्री करण्यासाठी या बैलांची चोरी केल्याचा संशय व्यक्त होत आहे.




सध्या गोवंश हत्येचे प्रकार वाढल्याने नेरळ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक ढवळे यांनी तपास सहाय्यक फौजदार श्रीरंग किसवे यांचेकडे देऊन डिटेक्शन पथकाचे पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर, सहाय्यक फौजदार किसवे, हवालदार नवनाथ म्हात्रे, शिपाई निरंजन दवणे, राजेभाऊ केकाण, विनोद वांगणेकर यांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे व गुप्त बातमीदाराच्या मदतीने साहिल नावेद शेख (वय २०, रा. रेतीबंदर रोड, कल्याण पश्चिम, ठाणे), इम्तियाज मोहम्मद इलियास शेख (वय ३२, रा.जहीर मौलवी बिल्डींग, वर्तक रोड, कल्याण पश्चिम, ठाणे) व अकबर जाबाज शेख (वय २८, रा. जहिर मौलवी चाळ, रेतीबंदर रोड, कल्याण पश्चिम, ठाणे) यांना सोमवारी अटक केली आहे तसेच आरोपींनी वापरलेली एक स्कॉर्पिओ गाडीही हस्तगत करण्यात आली आहे.

## खोपोलीत कोकण पदवीधर मतदारसंघाचे निरंजन डावखरे यांच्या विजयाचा जल्लोष

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदार संघाचे भाजपचे उमेदवार पदवीधर मतदारसंघातून निवडून आल्यानंतर खोपोलीत शहर मध्यवर्ती कार्यालयासमोर फटाक्यांची आतषबाजी करीत व्यापाऱ्यांना व नागरिकांना पेढे वाटप करण्यात आले. त्या वेळी भाजपच्या विजयाच्या घोषणा देण्यात आल्या.



या वेळी शहराध्यक्ष रमेश रेट्रेकर सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर, विस्तारक हेमंत नांदे, सुनील नांदे, हिम्मतराव मोरे, कीर्ती ओसवाल, संजय कचरे डॉ. निकेत पाटील, शहर सचिव, विनायक माडपे, ऋषिकेश म्हात्रे, विश्वास टिळक, प्रल्हाद अत्रे, वामन दिघे, महिला मोर्चाध्यक्ष अश्विन अत्रे, अपर्णा साठे, सुमती महर्षी, गीता मोहिते, सुनिता पाटणकर, विभा पाठक, रसिका शेटे, स्नेहल सावंत तसेच पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

आमदार निरंजन डावखरे यांचा तिसऱ्यांदा विजय होणार हे अपेक्षित होते. त्यांनी सातत्याने विधान परिषदेत पदवीधरांच्या समस्यांबाबत प्रश्न उपस्थित करून त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, असे जिल्हा महिला मोर्चाचे अध्यक्ष अश्विनी पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

## ताराबंद गावात सौर पथदिवे व्यवस्था

**मुरूड** : मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मुरूड तालुक्याचे सुपुत्र बाळा नांदगावकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मनसेतर्फे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शखाली बोर्ली ग्रामपंचायती अंतर्गत ताराबंदर येथील गावासाठी उपविभाग अध्यक्ष प्रतीक कणगी यांनी स्वखर्चाने तीन ठिकाणी स्वयंचलित सौर पथदिवे बसवण्यात आले आहेत.

या वेळी उपजिल्हा अध्यक्ष शैलेश खोत, तालुका सचिव राजेश तरे, शाखाध्यक्ष स्वागत मकाजी, बोर्ली शाखा अध्यक्ष शुभम पंढर, उपशाखाध्यक्ष त्रिशूल कानुगोजे, ताराबंदर कोळी समाज अध्यक्ष वैभव भोईर, ताराबंदर गाव पाटील प्रमोद कणगी, माजी समाज अध्यक्ष संजय पंढर, माजी उपाअध्यक्ष सुजित आग्रावकर, कोळी महासंघ उत्तर रायगड संपर्कप्रमुख भालचंद्र वर्सोलकर उपस्थित होते.



## माणगावात कुणबी समाजातर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**माणगाव** : माणगाव तालुका कुणबी भवन समाज साले ग्रुपतर्फे इ. १० वी व १२ वीमध्ये ६० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यर्थ्यांचा गुणगौरव सोहळा ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि.१४) सकाळी ११:३० वा. कुणबी भवन येथे आयोजित केला आहे. ग्रुपमधील सर्व गावातील इ. १० वी १२ वी विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रिकेची झेरॉक्स कुणबी भवन येथे ग्रुपचे सहसचिव रवींद्र अर्बन (९३७३३४३४१६) यांचेकडे जमा करावी, असे आवाहन ग्रुपचे सल्लागार महादेवराव बक्कम व अध्यक्ष भागोजी डवले यांनी केले आहे.

## सहकार क्षेत्र राजकारणापासून दूर ठेवावे -आमदार रविशेठ पाटील



**अलिबाग : प्रतिनिधी**

सर्वसामान्यांना गरजेला पतसंस्था उपयोगी पडतात, परंतु वसुली करताना अडचणी येतात. पतसंस्थांनी वसुलीच्या बाबतीत कठोर भूमिका घ्यावी. सहकार क्षेत्र राजकारणापासून दूर ठेवावे, असा सल्ला भाजप आमदार रविशेठ पाटील यांनी पतसंस्थांच्या संचालकांना दिला.

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघाचा रौप्यमहोत्सवी समारंभ रविवारी (दि.३०) आयोजित करण्यात आला होता. या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार रविशेठ पाटील बोलत होते. या वेळी व्यासपीठावर राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, सहकार भारतीचे राष्ट्रीय मंत्री डॉ. उदय जोशी, रायगड जिल्हा पतसंस्थाचा महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील, सचिव योगेश मगर, संचालक हेमंत पाटील, दिलीप पटेल, जगदीश कवळे, प्रकाश चांदिवडे, चंद्रकात घोसाळकर, ॲड. के. एस. पाटील, निजामुद्दीन कागदी, गणेश म्हात्रे, संजय वानखेडे, कविता ठाकूर, उषा चांदगांवकर, नरेन जाधव आदी उपस्थित होते.

पतसंस्थांच्या ठेवीसाठी बँकांच्याप्रमाणे ठेव विम्याचे संरक्षण द्यावे, अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सहकार विभागाने रिझर्व बँकेसमोर प्रस्तावदेखील ठेवला असून किमान पक्षी ज्या पतसंस्था नागरी सहकारी बँकेच्या प्रवेशांचे निकष पूर्ण करतील, त्यांना रिझर्व बँकेने बँक परवाने द्यावेत. तेव्हा स्वेच्छेने ज्या पतसंस्थांना बँकेमध्ये रुपांतर करायचे आहे. त्यांनी या योजनेत सहभागी होऊन सभासदांना ठेव विम्याचे संरक्षण प्राप्त होऊ शकेल आणि नियमांचा रेटा लक्षात घेता रूपांतर करणे अपरिहार्य असल्याचे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय मंत्री डॉ. उदय जोशी यांने व्यक्त केले.

राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील म्हणाले की, सहकार खात्याकडून अंशदानासाठी जी पतसंस्थांकडे हजारी १० पैसे मागणी होत आहे ती पतसंस्थांना भविष्यात अडचणीची ठरणार आहे. याकडे लक्ष वेधताना येत्या पाच वर्षांत ५० टक्के पतसंस्था बंद पडतील. या पार्श्वभूमीवर सर्व पतसंस्थांनी संघटितपणे महासंघाच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे.

सहकार चळवळ कोकणात खऱ्या अर्थाने रुजवावी सर्वसामान्यांची आर्थिक गरज भागावी यासाठी २५ वर्षे महासंघ कार्यरत असून स्वतःच्या मालकीची सदनिका सदस्य संस्थांच्या आर्थिक देणगीतून शक्य झाले आहे असे, रायगड जिल्हा पतसंस्थाचा महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

या वेळी रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले, तसेच सहकार भूषण पुरस्कार प्राप्तविजेते आदर्श पतसंस्था व देवेंद्रनाथ पतसंस्थेसह ७५ वर्षेवरील कार्य करणाऱ्या पेण प्राथमिक शिक्षक पतपेढी, रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढी,परस्पर पतसंस्था मुरूड, माथेरान नागरी पतसंस्था या पतसंस्थांचा भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

रायगड जिल्हा पतसंस्थाचा महासंघाचे सचिव योगेश मगर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

## श्रीवर्धन किनाऱ्यावरील वाढत्या अतिक्रमणावर कारवाईची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

सध्या श्रीवर्धन समुद्रकिनारा हे पर्यटकांसाठी आकर्षण ठरत आहे, मात्र या ठिकाणी विविध व्यावसायिकांनी आपले खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारून अतिक्रमण केले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

येथील किनाऱ्यावर सुसज्ज व सुशोभीकरण केलेला धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला आहे. या बंधाऱ्यांवर पर्यटकांना बसण्यासाठी बाकडी, त्याचप्रमाणे मचाण तयार करण्यात आले आहेत. विविध ठिकाणी सेल्फी पॉईंट, तसेच विद्युत रोषणाई, त्याचप्रमाणे कोळंबी, खेकडा यांसारख्या प्रतिकृती समुद्रकिनाऱ्यावर लावण्यात आल्या आहेत.

पर्यटक या ठिकाणी मोठ्या संख्येने येत असल्यामुळे विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावणाऱ्यांची गर्दीसुद्धा होऊ लागली आहे. या स्टॉल धारकांमध्ये जे जुने स्टॉलधारक आहेत ते श्रीवर्धन नगर परिषद हद्दीच्या बाहेरील आहेत. आत्ता नव्यानेच ज्यांनी जागा अडवून स्टॉल उभारलेले आहेत, असे श्रीवर्धन नगर परिषद हद्दीमधील स्टॉलधारक आहेत. ही जागा वनविभागाच्या अखत्यारित असल्याने त्या ठिकाणचे अतिक्रमण वन विभागाने हटवायचे की, नगर परिषदेने यामध्ये नेहमीच वाद निर्माण होत असतो. याबाबत त्वरीत निर्णय घेऊन स्टॉल हटवावे, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.





### कागदपत्रे हरविलेबाबत

मी,सौ. स्वाती सुनिल सावंत, पत्ता : रा. बी/४, सनराईज को. ऑप. हौ.सो., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

माझेकडून पनवेल परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. १३२४/२०२४ दिनांक. ०२/०७/२०२४ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालील प्रमाणे आहे.**

१. वर राहत असलेल्या घराचे शेअरसर्टिफिकेट नं.१२२

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९५९४९८३५४६ संपर्क साधावा.

**दिनांक :- २/०७/२०२४**

**सही/-**
**श्री.स्वाती सुनिल सावंत**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - मोहो, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १०८/३ | ०-२८-०० पो.ख. ०-०१-५० **एकूण ०-२९-५०** | ५.८१ | जगूबाई अनंत खुटारकर<br>हरेश्वर बाळाराम उर्फ बामा पाटील<br>संजय बाळाराम उर्फ बामा पाटील<br>भगवान जनार्दन म्हात्रे<br>वंदना शांताराम शेळके |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०३/०७/२०२४.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र.: ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून विकसनसाठी घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**मौजे-धरणागाव, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर. | आकार रु. पैसे | भोगवटदाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | २ | ०-५८-७० पैकी विकसनसाठी घेण्याचे क्षेत्र | ९.११ | |
| | | | ०.२९.०३ | ३.८० | सुनिता भरत कोठारी<br>इंद्रजितसिग<br>कुलजितसिंग चौधरी<br>कुलजितसिंग चौधरी |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. अमोल पवार**
**पत्ता: पहिला मजला, अवमेध व्हिला, सेक्टर १२, प्लॉट १२, नवीन पनवेल (पूर्व) जि.रायगड ४१० २०६ मो. क ९८३३७३७९२२**

## निवडक

### कोप्रोलीत चार ठिकाणी घरफोडी

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावात असलेल्या कमांडर रेनाईसन्स सोसायटीमध्ये चार घरांमध्ये झालेल्या घरफोडीत जवळपास दोन लाख ३६ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या ठिकाणी राहत असलेल्या रसिना अलिकोया यांच्या घरात चोरी होऊन घरात ठेवलेले विविध प्रकारचे सोन्याचे दागिने त्याचप्रमाणे इतर तीन ब्लॉकमध्येसुद्धा या अज्ञात चोरट्यांनी चोरी करून जवळपास दोन लाख ३६ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वसंतराव नाईक जयंती दिनी अभिवादन




**नवी मुंबई :** हरितक्रांती व श्वेतक्रांतीचे जनक, नामांकित कृषीतज्ज्ञ, महाराष्ट्र राज्याचे १२ वर्षे मुख्यमंत्रीपद भूषविणारे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. या वेळी उपायुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे, रवी जाधव, संजीव पवार आणि इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### अनधिकृत हॉटेल, बारवर कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबईतील अनाधिकृत व वाढीव बांधकाम करणाऱ्या हॉटेल, बार ॲन्ड रेस्टॉरंट, लेडीज बार, पब, लॉज, हुक्का पार्लरवर नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने महापालिका क्षेत्रात ३० जून रोजी रात्रीपासून १ जुलैच्या पहाटेपर्यंत धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले आहे तसेच मार्जिनल स्पेसचा गैरवापर केला आहे, अशा ४१ हॉटेल, बार, पब, हुक्का पार्लरवर तोडक कारवाई करण्यात आली.

### विजयशेठ मेथा यांचा सन्मान



**पनवेल :** माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक व शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था माणगावचे सल्लागार तथा गोरगरीब जनतेला दृष्टी मिळवून देण्यात आनंद मानणारे सामाजिक कार्यकर्ते खेमचंद (विजयशेठ) मेथा यांचा त्यांची सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन शंकरा आय हॉस्पिटल न्यू पनवेलतर्फे शनिवारी शंकरा आय हॉस्पिटल न्यू पनवेल येथे यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास डॉ.राजेश कापसे, डॉ.प्रकाश पाटील, डॉ.गिरीश बुधराणी, डॉ.आर. रामाणी, डॉ.राधा रामाणी आदी मान्यवरांसह विजयशेठ मेथा यांचे कुटुंबीय विधिता मेथा, स्नेहल मेथा तसेच जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, रंग सावळा, अंगाने सडपातळ, केस मोठे व काळे तसेच दाढी-मिशी वाढलेली असून, अंगात निळा शर्ट व काळी ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिवाळे खाडीतील मासेमारीवर पानवेलीचे संकट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळे खाडीत पावसाच्या प्रवाहसोबत आलेल्या पानवेलींमुळे मच्छीमारी करणाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

अनेक ठिकाणी भरावाचे काम सुरू केल्यापासून संकटात आलेली मासेमारी व त्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात तळोजा खाडीतून येणाऱ्या रायासानिक्युक्त पाणी व पानवेळीचेच्या लोंढ्यानी संकटात वाढ झाली आहे. त्यामुळे आधीच ९० टक्के मासळी गायब झाली होती त्यात आता उरलेल्या १० टक्के मासेमारीवर संकट आले आहे. मासेमारी करण्यासाठी पाण्यात टाकलेली जाळीदेखील या पानवेलीच्या लोंढ्यात अडकून लाखो रुपयांचे भुर्दंड दिवाळे ग्रामस्थांना सोसावे लागत आहे. नाक दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था दिवाळे ग्रामस्थांची झाली आहे. पूर्वी तळोज्या खाडीतून येणाऱ्या पानवेली या कोंबडभुजे, तरघर व पनवेलच्या दिशेकडे पावसाच्या प्रवाहाने सरकत जायच्या, मात्र आता त्याठिकाणी भराव टाकल्याने पानवेळी थेट दिवाळे खाडीकिनारी येत आहेत.

तळोजा एमआयडीसीमधील खाडीतून येणाऱ्या पावसाच्या प्रवाहात केमिकल व पाणवेळीचे नवी संकट दिवाळे गावातील मच्छीमारांवर कोसळले आहे.



> **दिवाळे कोळीवाडा हा १०० टक्के मच्छिमारांचा कोळीवाडा आहे. नवनवीन प्रकल्पामुळे या मच्छीमार समाजावर टांगती तलवार आली आहे. मुख्यतः पावसाळ्यात पावसाच्या प्रवाहातून येणाऱ्या पानवेलीमुळेही मच्छीमार लोकांचे आर्थिक नुकसान होत आहे.**
> **-हेमंत कोळी, ग्रामस्थ**

# स्वच्छता अपनाओ, बिमारी भगाओ अभियानाचा प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता आणि आरोग्य या एकमेकांशी संबंधित बाबी असून आपल्या घराप्रमाणेच आपला परिसरही स्वच्छ राहील याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. विशेषत्वाने पावसाळी कालावधीत आपल्या आरोग्याच्या दृष्टीने पाणी उकळून व गाळून पिणे, घरातूनच कचऱ्याचे ओला व सुका वर्गीकरण करून घंटागाडीत वेगवेगळा देणे आणि परिसर स्वच्छ राखणे या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, अशा शब्दांत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी उपस्थितांशी सुसंवाद साधला.

स्वच्छ भारत मिशनच्या वतीने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' अभियानाचा शुभारंभ वाशी येथील नमुंमपा सार्वजनिक रुग्णालयात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते झाला. या वेळी ते मनोगत व्यक्त करीत होते.

पावसाळी कालावधीत डासांमुळे मलेरिया व डेंग्यूसारखे आजार होतात. त्यामुळे डास उत्पत्ती रोखण्यासाठी आपण पाणी साचून डास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे दूषित पाण्यामुळे होणारे अतिसारासारखे आजार रोखण्यासाठी शुध्द पाणी पिण्याची आवश्यक खबरदारी घेतली पाहिजे. यादृष्टीने केंद्र सरकारमार्फत जाहीर करण्यात आलेले 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' हे अभियान आपल्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे असून त्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असेही आवाहन आयुक्तांनी केले.




या वेळी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी नवी मुंबई महापालिका शहर स्वच्छतेसाठी व आरोग्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगत नागरिकांनी या अनुषंगाने आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमात सक्रीय सहभागी व्हावे, असे सांगितले.

डॉक्टर्स दिनाचे औचित्य साधून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, उपआयुक्त डॉ. अजय गडदे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजेश म्हात्रे व डॉ. उध्दव खिल्लारे तसेच इतर डॉक्टर्सना गुलाबपुष्प देऊन डॉक्टर्स दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

आरंभ क्रिएशन्सच्या कलावंतांनी सादर केलेल्या पथनाटयाव्दारे स्वच्छतेतून आरोग्याचा संदेश मनोरंजनातून प्रबोधनात्मक स्वरुपात मांडण्यात आला. आयुक्त महोदयांच्या शुभहस्ते पथनाट्य कलावंतांचाही सत्कार करण्यात आला.

हे अभियान १ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार असून या अंतर्गत विशेष स्वच्छता मोहीमांचे आयोजन, कचरा संकलन आणि वाहतुकीचे नियोजन, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची नियमित स्वच्छता, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छताविषयक जागरूकता व त्यांच्या प्रत्यक्ष सहभागावर भर, शुध्द जलाच्या नियमित चाचण्या, स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरवठा आणि पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल, आरोग्याच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्रामध्ये विशेष लक्ष आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्वच्छता व पावसाळी कालावधीत घ्यावयाच्या आरोग्य विषयक दक्षतेबाबत जनजागृती व माहिती प्रसार, पीपीटी अर्थात आरोग्यविषयक संरक्षण प्रतिबंध व उपचार अंमलबजावणी अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येणार आहे.

## हुक्का पार्लरवर कारवाईची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कामोठेप्रमाणेच नवीन पनवेल परिसरात सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर खांदेश्वर पोलिसांनी तसेच अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करावी, अशी मागणी या परिसरात राहणारे रहिवाशी करीत आहेत.

नुकतीच कामोठे येथे हुक्का पार्लरवर मोठ्या प्रमाणात कारवाई करून तेथील मालक, व्यवस्थापक व कामगार यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. अशाच प्रकारे नवीन पनवेल परिसरात सुद्धा हुक्का पार्लर सुरू असून रात्री उशिरापर्यंत सर्व नियम धाब्यावर बसवून चालणार्या या हुक्का पार्लरमुळे परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्याचप्रमाणे रात्रीच्या वेळी तरुण पिढीची आरडाओरड व भांडणे हे नेहमीचेच झाले आहे. तरी तरुण पिढीला व्यसनाच्या खाईत लोटणाऱ्या या हुक्का पार्लरवर शासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी या भागातील रहिवाशी करीत आहेत.

# एसएससी सराव परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गणेश नाईक चॅरिटेबल ट्रस्ट आणि श्री संदीप नाईक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एसएससी सराव परीक्षेचा गुणगौरव सोहळा वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाला. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक सुसंवाद शिबिराचेदेखील आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख अतिथी आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते सराव परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना तसेच स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतलेले पदाधिकारी, शिक्षक आणि केंद्रीय प्रमुख यांचादेखील सन्मान करण्यात आला. नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक यांच्यासह पदाधिकारी आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर या सोहळ्यात उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार गणेश नाईक यांनी १९९०पासून सुरू झालेली ही सराव परीक्षा आजपर्यंत दीड लाख विद्यार्थ्यांनी दिल्याचे सांगितले. एसएससी सराव परीक्षेने विद्यार्थ्यांच्या मनातील मुख्य परीक्षेबद्दलची भीती दूर करून मुख्य परीक्षेमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होण्याचे बळ दिले. पूर्वी शिक्षण हे नोकरीसाठी घेतले जात होते, परंतु आत्ताचे शिक्षण हे चांगले जीवन जगण्यासाठी घेतले जाते. कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी खचून न जाता जिद्दीने प्रयत्न सुरू ठेवले पाहिजे. हरलेला सामना जो जिंकतो त्याला बाजीगर म्हणतात. टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेमध्ये भारताने जिंकलेल्या अंतिम सामन्याचे उदाहरण देत लोकनेते आमदार नाईक यांनी विद्यार्थ्यांना अपयश आले तरी निराश न होण्याचा सल्ला दिला. अपयशातून यशाचा मार्ग सापडत असतो, असेही ते म्हणाले. नवी मुंबई शहर हे महाराष्ट्रातील शैक्षणिक हब झाल्याचे त्यांनी नमूद केले.



नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी ही एसएससी सराव परीक्षा लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्यापासून प्रेरणा घेत सुरू झाल्याचे सांगितले. एसएससी सराव परीक्षा उपक्रमाने रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून मागील २५ वर्षे हा उपक्रम नियमित सुरू आहे. यावर्षी २७ परीक्षा केंद्रांवर परीक्षा झाली. तब्बल १४ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यावर्षी विद्यार्थ्यांचा उच्चांकी प्रतिसाद होता. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व घटकांचे जिल्हाध्यक्ष नाईक यांनी आभार व्यक्त केले. एसएससी सराव परीक्षेतून विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासातील उणीवा कळतात. मुख्य परीक्षेला सामोरे जाण्याच्या अगोदर विद्यार्थी या उणीवा दूर करतात. त्यामुळे मुख्य परीक्षेत त्यांना चांगले यश मिळते. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी भविष्यात शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी सुसंवाद कार्यक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांवरील दडपण कमी करण्यासाठी या घटकांमधील सुसंवाद गरजेचा आहे, असे सांगतानाच विद्यार्थ्यांबाबतचा कोणताही निर्णय घेताना त्याची क्षमता आणि त्याचा कल या दोन बाबी विचारात घेणे अत्यावश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले. विद्यार्थ्यांसाठी तणावमुक्ती कार्यक्रमासोबतच रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन मेळावे घेण्यात येतील, असे त्यांनी जाहीर केले. अन्य शहरांमध्ये मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या घटत असताना नवी मुंबईतील नेतृत्वाने शिक्षणाच्या बळकटीकरणासाठी घेतलेल्या निर्णयामुळे नवी मुंबई महापालिकेच्या शाळांमधून मात्र पटसंख्या वाढत असल्याचे नमूद केले. नवी मुंबईमध्ये शालेय ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सोयी सुविधा उपलब्ध असून नवी मुंबई पुण्यानंतर विद्येचे माहेरघर बनले आहे. नवी मुंबईची ही ओळख भविष्यात अधिक ठळक होत जाईल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी व्यक्त केला.

### गुणवंत विद्यार्थी

**मराठी सेमी मराठी माध्यम**
स्नेहल डोंगरे, अभिलाषा डोईफोडे, तनेश सुभाष, ध्रुव बेलवेकर, ऋषिकेश पाटील.

**हिंदी आणि सेमी इंग्रजी माध्यम :** मधुराणी गुप्ता, अम्रतेष गौड, अश्विनी शर्मा.

**इंग्रजी माध्यम :** पल्लवी कुमारी सिंग, सारा ठाकूर, माही ओरा.

# द्रोणागिरी लायन्स क्लब आणि लिओ क्लबचा पदग्रहण सोहळा



**उरण : बातमीदार**

लायन क्लब ऑफ द्रोणागिरी आणि लिओ क्लब ऑफ द्रोणगिरीचा नवीन पदाधिकारी यांचा पदग्रहण सोहळा पांडुरंग चांगु पाटील स्कूल चारफाटा उरण येथे झाला. या वेळी सर्व लायन व लिओ पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

अध्यक्ष सागर चौकर, उपाध्यक्ष भूमिका सिंग, सेक्रेटरी मोनिका चौकर व खजिनदार ॲड. दिपाली गुरव व तसेच लिओतर्फे लिओ अध्यक्ष ॲड. चेतन भोईर, उपाध्यक्ष सेजल ब्राह्मणे, सेक्रेटरी विनीत कासकर व खजिनदार आरती सुरवसे या नवीन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून पदभार देण्यात आले. या नवीन पदग्रहण सोहळ्यानिमित्त नाईक नगरच्या मुलांनी व उपस्थित सर्व पाहुण्यांनी सिड बॉलचे उद्घाटन केले. त्याचबरोबर शैक्षणिक साहित्य वाटप ही करण्यात आले व जमलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी नृत्याचे ही आयोजन करण्यात आले होते.

लायन क्लब ऑफ द्रोणागिरी तसेच लिओ क्लब ऑफ द्रोणगिरी गेले तीन वर्षे उरणमध्ये सातत्याने समाजकार्य करत असून लायन क्लब चा इतिहास आपण बघितला असाल तर इंटरनॅशनल पातळी वर त्यांचं खूप मोठ नाव आहे. लायन मेम्बर्सच्या मदतीने वेगवेगळे क्टिव्हिटी दिवसेंदिवस होत असून एज्युकेशन, अन्न दान, मेडिकल कँप, सिड बॉल, झाडे लावणे, बीच क्लीन करणे, कॉलेजसाठी सेमिनार अशा विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटी होतच असतात. समाजासाठी एक हातभार लावण्यासाठी क्लबमधील मुल आज सातत्याने काम करत आहेत. यापुढे ही गोर गरिबांसाठी व लोकांसाठी काम करत राहतील असा हा क्लब नेहमी सर्वांसाठी मदत करण्यासाठी सर्वांत पुढे आहे.

उपस्थित पाहुणे पी.एम. जे.एफ एन.आर परमेश्वरन, लिओ डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट जेडेन सॉलोमन, पीएमजेएफ अनुप थरवानी, पीएमजेएफ नमिता मिश्रा, झोन चेअरपरसन अल्केश शहा, रीजन चेअरपरसन सुयोग पेंडसे, सीमा घरत, लायन मिलिंद पाटील, रमाकांत म्हात्रे लायन संदीप म्हात्रे, सिद्धी साळुंके व सर्व लिओ व लायन क्लबचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नेरूळ रेल्वे स्टेशन परिसराची लोकसहभागातून स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४'च्या अनुषंगाने स्वच्छता अपनाओ -बिमारी भगाओ अभियान नागरिकांच्या सहभागातमन संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. त्यानुसार नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली नेरूळ रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहीमेत नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे यांनी विभागातील अधिकारी, कर्मचारीवृंद व स्वच्छता मित्रांसह सक्रीय सहभागी होत स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या झाली. यामध्ये महाविद्यालयीन एनएसएस विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य, स्थानिक रिक्षा ड्रायव्हर तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्लास्टिक बॉटल्स, रॅपर्स, प्लास्टिक, थर्माकोल व कागदाचे तुकडे अशा प्रकारचा कचरा जमा करून नेरूळ रेल्वे स्टेशनचा परिसर साफ करण्यात आला. यामध्ये एकूण ५० गोणी कचरा जमा करण्यात आला.

# जुन्या बटाट्याला मागणी; दरात वाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच दररोज लागणाऱ्या हिरव्या भाज्यांचे दर कडाडले, कडधान्यांच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या घराचे बजेट कोलमडले आहे. त्यातच आता स्वयंपागृहात रोज लागणार बटाटादेखील महाग झाला आहे.



नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा बटाटा मार्केटमध्ये आता बटाट्याच्या दरातदेखील वाढ झालेली पाहायला मिळत आहे. दरम्यान, बटाट्याचे नवीन पीक बाजारात येईपर्यंत कमी प्रमाणात बटाटा बाजारात येत आहे. त्यामुळे दरातही वाढ होत आहे. येत्या डिसेंबर महिन्यात बटाट्याचे पिक बाजारात येण्याची शक्यता आहे. त्यामुळं आणखी पाच सहा महिने बटाट्याचे दर वाढलेलेच राहतील, असे व्यापारी मनोहर तोतलानी यांनी सांगितले.

मार्केटमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर ओला बटाटा दाखल होत आहे. ओला बटाटा जास्त काळ टिकत नसल्यामुळे सुक्या बटाट्याला ग्राहकांची अधिक मागणी असते. त्यामुळे जुन्या बटाट्याच्या दरात वाढ झालेली पाहायला मिळत आहे. पूर्वी घाऊक बाजारात २० ते २३ रुपये किलोने विकला जाणारा बटाटा आता महाग झाला आहे. सध्या मार्केटमध्ये सुमारे ५० गाड्यांची आवक होत असून सुक्या बटाट्याला मागणी जास्त असल्याने त्याच्या दरात वाढ झाली आहे. चांगला बटाटा २६ ते २८ रुपये तर ओला बटाटा १८ ते २२ रुपयांनी विकला जात आहे.

पावसामुळे बटाटा ओला होऊन खराब होत असल्यामुळे बटाट्याच्या दरात वाढ झालीआहे. किरकोळ बाजारात बटाटा ४० पार झाला आहे. त्यात काही बटाट्याला कोंब देखील येत असल्याने ग्राहक कोंब आलेले बटाटे शक्यतो खरेदी करत नाहीत. महाराष्ट्रातून तसेच गुजरात येथून बटाटे सध्या एपीएमसी येत आहेत.

## निवडक

### कर्जतमध्ये कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप



**कर्जत** : दहिवली येथे नगर परिषदेमधील साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पावसाळ्यात बचाव करण्यासाठी शिवसेनेचे उपशहर प्रमुख दिनेश कडू यांच्याकडून रेनकोट वाटप करण्यात आले. पावसाळ्यात संसर्गजन्य रोगास प्रतिबंध करण्यासाठी स्वच्छता महत्त्वाची आहे. पावसामुळे स्वच्छतेत बाधा येऊ नये. झाडूवाले, गटार बिगारी, सफाई कर्मचाऱ्यांना कडू यांनी पुढाकार घेऊन वाटप करण्यात आले आहे. या वेळी सफाई कामगार प्रकाश जाधव, अविनाश पिंपळे, महेंद्र गायकवाड, दिपक भालेराव, निलेश गायकवाड आदी उपस्थित होते.

### चौल पाझर येथे वृक्षारोपण



**रेवदंडा** : चौल पाझर येथे कृषक कल्याणकारी संस्थेतर्फे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमास रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघ व निसर्गप्रेमी संस्था यांचे श्रमदान व विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास एम. डी. तायडे यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. या वेळी आवळा, करंज, चिंच, खैर, जांभूळ, वड, भावाह, काजू, आपटा आदी १०० रोपट्यांची लागवड करण्यात आली. अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी, वृक्षरोपणासह वृक्ष संवर्धन करणे महत्त्वाचे आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे शेवटी उपस्थितांचे आभार संस्थेचे सचिव प्रकाश पाटील यांनी मानले.

### रोह्यात भाजपतर्फे शेतकऱ्यांना रोपे

**धाटाव :** कृषी दिनानिमित्त तालुक्यातील पहूर येथील शेतकऱ्यांना विविध प्रकारची रोपे भाजपच्या वतीने देण्यात आला. आपणास आयुष्य जगण्यासाठी स्वच्छ वातावरण आवश्यक असते. नागरिकांनी त्यांच्या परिसरात किमान एक तरी वृक्षलागवड लावून आपले परिसर हिरवेगार करण्याच्या लोकोपयोगी कार्यास बळ द्यावे, असे आवाहन भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी केले. या वेळी भाजपचे सचिन मोरे, रितेश घाग, श्रीकांत दरडे, राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, सामाजिक कार्यकर्ते निखिल धनावडे, सागर वाडेकर, अनिकेत धनावडे, प्रतिक यादव यांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.



# नागरिकांना नियमित आणि चांगल्या सेवा द्याव्यात

## ■ जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे बैठकीत निर्देश

**रायगड : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्याला प्राथमिकता क्षेत्रासाठी सहा हजार ६०० कोटींच्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून ते साध्य करण्यासाठी बँकांनी व शासकीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून नागरिकांना नियमित आणि चांगल्या पद्धतीने सेवा द्याव्यात असे, निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हास्तरीय सल्लागार व आढावा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात नुकतीच झाली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी भारतीय रिझर्व बँकच्या वित्तीय समावेशन आणि विकास विभागाचे व्यवस्थापक अरुण बाबू, बँक ऑफ इंडिया रायगडचे विभागीय व्यवस्थापक मुकेश कुमार, स्टेट बँकेचे विभागीय व्यवस्थापक सुरेश शिंदे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रदीप अपसुंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, जी.एस. हरळय्या, कृषी विभागातील कृषी अधीक्षक वंदना शिंदे, माविमचे जिल्हा व्यवस्थापक अशोक चव्हाण, वर्षा पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, दौलकर, आरसेटीचे संचालक सुमित धानोरकर तसेच विविध विभाग व महामंडळाचे अधिकारी, बँकांचे जिल्हा समन्वयक प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, खरीप हंगामासाठी रू.३१५ कोटींचे उद्दिष्ट असून ऑगस्ट अखेर १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करावी. मत्स्य व्यवसाय आणि दुग्धव्यवसाय अंतर्गत किसान क्रेडिट कार्ड देण्याला प्राधान्य देण्यात यावे तसेच शासकीय योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावा, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या. पीक कर्ज योजनेसह अन्य शासकीय योजनांतर्गत बँकांकडे प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत. सर्व शासकीय योजनांच्या कर्ज प्रकरणांची डिसेंबरअखेर उद्दिष्ट पूर्तता करावी. शासनाच्या आणि महामंडळांच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना मिळवून देण्यात यावा. यासाठी बँकांनी वार्षिक पतपुरवठा आराखड्याबरोबरच शासकीय व महामंडळांच्या योजनांची उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे, तसेच कृषी व तत्सम क्षेत्र, लघु उद्योगक्षेत्र, प्राथमिक, अप्राथमिक क्षेत्राची उद्दिष्टपूर्ती करावी. प्रधानमंत्री अन्नप्रक्रिया योजनांमध्ये लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो त्या अंतर्गत जास्तीत जास्त प्रकरणे होण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घ्यावा.

बँकानी ग्राहकांना बँकिंग सुविधा पुरविण्याबरोबरच त्यांना आर्थिकदृष्ट्या साक्षर करण्यासाठी पुढाकार घ्यावा. यासाठी कर्ज मेळाव्याबरोबरच आर्थिक साक्षरतेचे नियोजन करावे. जास्त व्याज घेणाऱ्या संस्थांमधून कर्ज न घेता सरकारी बँकामधून घ्यावे तसेच बनावट नोटा ओळखणे व नाण्यांच्या वापरासंबंधी जिल्ह्यात जनजागृती मेळावे आयोजित करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घ्यावा, असेही जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

या वेळी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासह विविध महामंडळांच्या योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, बचत गटांना पतपुरवठा, पीएम स्वनिधी, स्टँड अप इंडिया, विश्वकर्मा योजना, कृषी पायाभूत विकास निधी आदी विषयांचा आढावा जिल्हाधिकारी जावळे यांनी घेतला. लीड बँकेच्या वार्षिक पतपुरवठा आराखडा पुस्तिका २०२४-२५चे व आरसेटीच्या वार्षिक कृती आराखडा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## कर्जत वन विभागातर्फे रोप विक्री केंद्र

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत वन विभाग यांच्याकडून वनमहोत्सव साजरा होत असून शेतकरी, तरूण वर्गाने मोठ्या प्रमाणात कर्जत येथे वृक्ष लागवड करावी, यासाठी स्वस्त दरात रोप विक्री केंद्र सुरू केले आहे. वनविभागाच्या अमृत वृक्ष आपल्या दारी ही संकल्पना कर्जतमध्ये राबविली जात आहे.

कृषी दिनापासून वन विभाग वन महोत्सव साजरा करीत आहे. यावर्षी १ ते ८ जुलै या कालावधीत वन महोत्सव साजरा होणार आहे. वन महोत्सवानिमित्त वनविभाग अलिबाग अंतर्गत वनपरिक्षेत्र कर्जत पूर्व, पश्चिम व सामाजिक वनीकरण कर्जत यांचे माध्यामातून स्वस्त दरात रोपे विक्री केंद्राचे उद्घाटन लाडीवली येथील प्रगतशील शेतकरी नरेश तुपे यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात करण्यात आले.

या वेळी कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण, समीर खेडेकर, मिलिंद राऊत व वनविभाग कर्मचारी तसेच तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड उपस्थित होते. स्वस्त अलिबाग वनविभागाचे उपवनसंरक्षक राहुल पाटील व सामाजिक वनीकरण विभागाचे स्वप्निल घुरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन वनमहोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

पुढील आठवडाभर त्या स्टॉलवर स्वस्त दरात झाडे उपलब्ध असून हा स्टॉल दिवसभर तसेच सुट्टीच्या दिवशी देखील सुरू राहणार आहे, अशी माहिती वनक्षेत्रपाल अनिल चव्हाण यांनी दिली आहे.

## जिल्हा रुग्णालयात बालकांसाठी तपासणी शिबिर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबागमधील जिल्हा रुग्णालय येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या मार्गर्शनाखाली ० ते १८ वयोगटातील बालकांची मोफत तपासणी शिबिर झाले.

या शिबिरात बाल अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. मुदीत शहा यांनी १७ बालकांची तपासणी केली व बाल मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. अंकित पांडे यांनी २४ बालकांची पूर्वतपासणी करून पुढील उपचारासाठी संदर्भित केले.

या शिबिरासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पंकज पाटील, डॉ. आशिष मिश्रा, आरबीसके समन्वयक सुनील चव्हाण, डीईआयसी व्यवस्थापक गणेश भोसले, सामाजिक कार्यकर्ता ज्ञानदीप भोईर, सायकॉलॉजिस्ट राजेश पवार, भौतिकउपचार तज्ज्ञ प्रतिष्ठा नाखवा, स्पेशल एज्युकेटर सीमा विषे, अधिपरिचारिका, ऐश्वर्या थळे आदींनी सहकार्य केले.



## मुरूड पं.स. येथे कृषी दिनी विविध कार्यक्रम





**मुरूड : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन व राजर्षी शाहू महाराज यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन संमेलन सप्ताह हे कृषी विभाग मुरूड व बार्टी (पुणे) यांच्या संयुक्त विद्यामाने पंचायत समिती येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ, कक्ष अधिकारी संजय वानखेडे, गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, शाखा अभियंता आशिष मुकणे, डी. के. पाटील, मेघराज जाधव, प्रगतशील शेतकरी श्रीधर जंजीरकर, वि. अधिकारी (कृषी) राखी खोपकर, वसंत दळवी, समतादूत वैशाली पेरवे-खरपडे, कृषी सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, आयसीडीएस विभाग कर्मचारी, एमएसआरएलएम विभाग कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

वसंतराव नाईक व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. सर्व मान्यवरांनी कृषी दिनानिमित्त तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा दिल्या व शेती संदर्भात विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी सर्व शेतकऱ्यांस शेतीसंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले व योजनांची माहिती दिली. वैशाली पेरवे यांनी राजश्री शाहू महाराज यांनी शेतीसंदर्भात केलेल्या कार्याचे मार्गदर्शन केले, तसेच विस्तार अधिकारी राखी खोपकर यांनीही विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. शेतकरी बांधवांना बांधवांचा गुलाबपुष्प व एक झाड देऊन सत्कार करण्यात आला. पं. स. आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

## विद्युत समस्यांविरोधात खोपोली महावितरणवर संघर्ष समितीचा हल्लाबोल

**खोपोली : प्रतिनिधी**





गेल्या काही महिन्यांपासून खोपोली व खालापूर तालुक्यात वीजपुरवठ्यात येणाऱ्या सततच्या व्यत्ययामुळे सहनशीलतेचा कडेलोट झाल्यामुळे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी खोपोली-खालापूर संघर्ष समितीच्या माध्यमातून वीजवितरणच्या उपविभागीय कार्यालयावर सोमवारी (दि.१) धडक दिली.

डॉ. शेखर जांभळे यांच्या माध्यमातून जनतेने ज्येष्ठ नेते उल्हासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापारी राजेंद्र फक्के, सुभाष पोरवाल, अजित जैन, अशोक ठकेकर, महेश जाखोटिया, दिवेश राठोड, प्रशांत साठे, जुझार खोपोलीवाला, शरद शिंदे, राकेश ओसवाल, नितेश कसबे, समीर साठे तसेच इंडस्ट्रिअलकडून अनिल खालापूरकर, अश्पाक लोगडे, धर्मराज पाटील तसेच सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र हर्डीकर, हानीफ दुदूके, मोहन केदार, सुरेखा खेडकर, नम्रता परदेशी व अन्य कार्यकर्त्यांनी महावितरणचे उपविभागीय अभियंता सतीश गढरी यांना कार्यालयातच घेरले.

दर मंगळवारी सातत्याने शटडाऊन व गेल्या तीन मंगळवारी प्रत्येकी सात तासांहून अधिक शटडाऊन घेऊनही दररोज अनेकदा वीज गायब होते. शनिवारी सायंकाळी ६ वा. पासून मध्यरात्री १ वा. पर्यंत शहरातील वीजपुरवठा पूर्णपणे बंद होता. रविवारीही अनेकदा व्यत्यय आले. यावर उपकार्यकारी अभियंता सतीश गढरी यांनी पायाभूत समस्या दूर करण्यासाठी आणखी तीन महिने तरी लागतील, अशी भूमिका घेऊन लेखी हमी देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे सर्व जण संतप्त झाले. त्यांनी वीजपुरवठा नियमित होईपर्यंत बिले न भरण्याचा इशारा देऊन अधिकारी लेखी हमी देत नाहीत म्हणून कार्यालयाबाहेर जाऊन घोषणाबाजी केली.

सक्तीची बिलवसुली करणाऱ्या महावितरणने सुधारणा न केल्यास येत्या आठ दिवसांत लढा उभारला जाईल व यातून वाद अथवा तेढ निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महावितरणची राहील, असा इशारा स्थानिक व्यापारी सुभाष पोरवाल व राजेंद्र फक्के यांनी दिला आहे. दरम्यान याबाबत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा व तक्रार करण्यासाठी माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते दत्ताजी मसुरकर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय नेत्यांनी बैठक घेतली.

या वेळी माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, माजी नगरसेवक मनेश यादव, मोहन औसरमल, शिवसेना शहरप्रमुख संदीप पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अतुल पाटील, रिचर्ड जॉन आदी पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कार्यकारी अभियंता विजवितरण, ऊर्जा मंत्री यांची भेट घेऊन विजवितरणाबाबत तक्रार करून तातडीने सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरले.

## कोंडेथर घाटातून पर्यटक निघाले कोकण दर्शनाला

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुका निसर्गसौंदर्याने संपन्न असा तालुका आहे. विविध प्रकारच्या वनस्पती, वन्यप्राणी, नैसर्गिक धबधबे व ऐतिहासिक वास्तू यामुळे या तालुक्याला पर्यटनाची मोठी संधी आहे. कोकणाला जोडणाऱ्या या तालुक्याला ताम्हिणी घाटरस्ता निर्माण झाल्याने अधिक फायदा होत आहे.

ताम्हिणी घाटातील पावसाळ्यातील धबधब्यामुळे माणगाव तालुक्याची ओळख अधिक गडद झाली आहे. या प्रवेशद्वाराबरोबरच पर्यटकांना उपयुक्त असणाऱ्या काही ऐतिहासिक पाऊल खुणा माणगावात पाहायला मिळतात. पुणे-ताम्हिणी मार्ग हा वाहतुकीसाठी तब्बल २३ वर्षापूर्वी खुला झाला. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्याला जोडणाऱ्या जिल्ह्यांसाठी कमी अंतराचे कमी वेळेत पर्यटन दर्शनाची भ्रमंतीकरीता कोकणात येऊ लागला. ताम्हिणी रस्त्यामुळे पर्यटनात लक्षणीय वाढ झाली आहे.

कोकणातील मोहक दर्शन हिरवागार डोंगर त्या डोंगरातून वाहणारी दरी व फेसाळ धबधबे शेकडो मीटर उंचीवरून नागमोडी रस्ता करीत धावतात. त्यातच भुरळ पडते ती उतारू रस्ते व नागमोडी वळणावरील कड्या कपारीची. उंच कड्यावरून रायगडची वाट काढणारा नागमोडी रस्ता आणि त्या रस्त्यावरील वळणे हे पर्यटकांचे वाढते आकर्षण आहे. त्यातच नजर जाते ती डोंगरापार दडलेल्या छोट्या कौलारू गाव कुसांची. त्या गाव कुसा बाहेरील छोटी हिरवीगार भातशेती आणि त्या शेतातून वाट काढीत छोट्या-छोट्या नद्यांना मिळणारे पाणी हे दृश्य पाहून पर्यटक हरवून जातात.

**माणगाव तालुका निसर्गसंपन्न व धबधबे तसेच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. ताम्हिणी मार्गामुळे पुणे व इतर शहरे जोडली गेली आहेत. त्यामुळे पर्यटन वाढ होत असून पर्यटकांची संख्या वाढत आहे. याचा निश्चितच फायदा शेतकरी व व्यापारी तसेच व्यावसायिकांना होत आहे.**

**-काशिनाथ गाणेकर, सामाजिक कार्यकर्ता**

## श्रीवर्धन शहरात मोकाट घोड्यांमुळे नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : बातमीदार**



शहरात सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे पर्यटकांची संख्या खूप कमी झालेली आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या घोड्यांना सध्या काम नसल्याने मोकाट सोडून देण्यात आले आहे. घोड्यांच्या मुक्त संचारामुळे नागरिक, शेतकरी, बागायतदार त्रस्त झाले आहेत. एका वेळेला १५ ते २० घोड्यांचा कळप नारळ, सुपारीच्या वाड्यांमध्ये घुसतो व त्या ठिकाणी असलेल्या झाडांचे नुकसान करतो. त्याचप्रमाणे शेतीचेदेखील खूप नुकसान होत आहे.

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेकडे कोंडवाडा उपलब्ध होता. त्यामुळे पकडून आणलेले घोडे किंवा गुरे कोंडवाड्यात ठेवली जात असत. संबंधित प्राण्यांचा मालक आल्यानंतर त्याच्याकडून रितसर दंड वसूल केला जात असे, परंतु नगर परिषदेने कोंडवाड्याच्या जागी पर्यटक निवास बांधल्याने घोडे पकडले तर ठेवायचे कुठे हा प्रश्न प्रशासनासमोर आहे. या घोड्यांच्या विष्ठेमुळे परिसरामध्ये दुर्गंधीदेखील पसरते.

अनेक वेळा हे खोडे जोरजोरात किंकाळत धावत सुटतात. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी किंवा बाजारपेठेत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. नगर परिषदेने या मोकाट असलेल्या घोड्यांच्या मालकांवर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघात बदल

## तिघांना वगळून नव्या चेहऱ्यांना संधी; लक्ष्मण प्रशिक्षक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ट्वेंटी-२० विश्वचषक जिंकताच भारताची युवा ब्रिगेड झिम्बाब्वेविरूद्ध ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेला ६ तारखेपासून सुरुवात होत आहे. अशातच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आपल्या संघात मोठा बदल केला असून तीन नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

संजू सॅमसन, शिवम दुबे आणि यशस्वी जैस्वाल यांच्या जागी पहिल्या दोन सामन्यांसाठी साई सुदर्शन, जितेश शर्मा आणि हर्षित राणा यांना संधी मिळाली आहे, तर झिम्बाब्वे दौऱ्यासाठी राहुल द्रविड यांच्या जागी व्हीव्हीएस लक्ष्मण संघाचे



हंगामी मुख्य प्रशिक्षक असतील.

भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यासाठी रवाना झाला. त्याचे फोटो बीसीसीआयने शेअर केले आहेत. व्हीव्हीएस लक्ष्मणदेखील संघासोबत दिसले, जे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक असणार आहेत. यापूर्वीही काही छोटेखानी स्पर्धांसाठी भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी त्यांनी घेतली आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून द्रविड यांचा प्रवास २९ जून रोजी संपला.

सामने भारतीय वेळेनुसार दुपारी ४.३० वा. सुरू होतील. सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर सामन्यांचे थेट प्रक्षेपण होईल. मालिकेचे लाईव्ह स्ट्रीमिंग सोनीलिव्ह ॲप, वेबसाइटवर उपलब्ध असेल.

**पहिल्या दोन सामन्यांसाठी भारतीय संघ**

शुबमन गिल (कर्णधार), ऋतुराज गायकवाड, अभिषेक शर्मा, रिंकू सिंग, ध्रुव जुरेल, रियान पराग, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, आवेश खान, खलील अहमद, मुकेश कुमार, तुषार देशपांडे, साई सुदर्शन, जितेश शर्मा, हर्षित राणा.

### ...म्हणून करावा लागला बदल

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा आधीच करण्यात आली होती, ज्याचे कर्णधारपद शुबमन गिलकडे देण्यात आले होते. दरम्यान, या मालिकेसाठी टी-२० विश्वचषक संघातील एकूण पाच खेळाडूंची निवड करण्यात आली आहे, पण भारतीय संघ खराब हवामानामुळे बार्बाडोसमध्ये अडकल्याने मायदेशी वेळेत परतला नाही. त्यामुळे संघात अचानक बदल करणे भाग पडले आहे.

आठवी ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धा

# मुलींमध्ये हरियाणा, तर मुलांमध्ये गोवा संघ विजेता



**चिपळूण : प्रतिनिधी**

ॲम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने, महाराष्ट्र लगोरी संघटनेच्या वतीने आठवी ज्युनिअर (एकोणीस वर्षाखालील) राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच चिपळूण येथे झाली. या स्पर्धेत भारतातील २१ राज्यातून १८ मुलांचे व २० मुलींचे संघ सहभागी झाले होते.

स्पर्धेत मुलांच्या गटात गोवा संघाने विजेतेपद, उपविजेतेपद महाराष्ट्राने, तर तृतीय क्रमांक बिहार व झारखंड संघाने मिळवले. मुलींमध्ये हरियाणा संघाने सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपद जिंकले. उपविजेतेपद गोवा संघाने मिळविले, तर तृतीय क्रमांक बिहार व उत्तराखंड संघाने प्राप्त केला. मुलांमध्ये बेस्ट प्लेयर अवॉर्ड हरियाणाचा अमन कुमारने, तर मुलींमध्ये बिहारमधील काजलने पटकावला.

स्पर्धेचे उद्घाटन भोजपुरी अभिनेता, फायटर मास्टर प्रिन्स मिश्रा व श्री विठ्ठलराव जोशी ट्रस्टचे पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आर.एच. देशपांडे यांच्या हस्ते लगोरीचे जनक स्व. संतोष गुरव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून तसेच लगोरी फोडून करण्यात आले. या वेळी लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदीप गुरव, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे संचालक श्रीकांत पराडकर, लगोरी संघटनेचे पदाधिकारी ॲड. प्रिया गुरव, तुषार जाधव उपस्थित होते.

सामने रोमांचक व अटीतटीचे झाले. स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे मुख्य व्यवस्थापकीय विश्वस्त विलास वालावलकर यांच्या उपस्थितीत व लगोरी संघटनेचे अध्यक्ष संदीप गुरव, भोजपुरी अभिनेता प्रिन्स मिश्रा, ट्रस्टचे संचालक श्रीकांत पराडकर, महाराष्ट्र लगोरी संघटनेचे सचिव भरत गुरव, भारतीय लगोरी संघटनेचे पदाधिकारी तसेच बिहार लगोरी संघटनेचे रंदिर कुमार, गोवा लगोरी संघटनेचे सचिव तन्वेश वेंगुर्लेकर, हरियाणा लगोरी संघटनेचे सचिव जयवीर दुडी, आसाम लगोरी संघटनेचे सचिव रितू, अरुणाचल प्रदेशचे सॅनडी चॅरी व सहभागी सर्व राज्यांचे पदाधिकारी यांच्या

टार्गेट टीम लगोरी प्रकारात अरुणाचल प्रदेश संघाला विजेतेपद, तामिळनाडू संघाला उपविजेतेपद, तर तृतीय क्रमांक पाँडिचेरी संघाने मिळवला. मिक्स डबलमध्ये कर्नाटकला विजेतेपद, उपविजेतेपद आसाम संघाने तर तृतीय स्थान दिल्ली संघाने मिळविले. या स्पर्धेतून निवडलला मुले व मुलींचे संघ सप्टेंबरमध्ये थायलँड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लगोरी स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते. या स्पर्धेस खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद लाभला.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण त्यांच्याच हस्ते झाले. स्पर्धा लीग कम नॉक आउट पद्धतीने घेण्यात आली. चीफ रेफरी म्हणून पॉल डीमेलो व शामल डेब्बार्मा यांनी काम पाहिले, तर सूत्रसंचालन जागतिक खेळाडू पृथ्वेशकुमार मंडले याने केले.





**गटनिहाय विजेते**

नवोदित : मुली-आराध्या ढेंडे (उलवे नोड) विजेती, घृती अगरवाल (नवी मुंबई) उपविजेती, पृथा मोहिते (नवीन पनवेल) व इशाना संदीपकुमार (नेरूळ) तृतीय क्रमांक. मुले-विहान अम्बास्था विजेता, प्राकेट गोयल उपविजेता, कावेश ठक्कर व अर्नव साळावकर (चौघेही नवी मुंबई) तृतीय; ११ वर्षाखालील : मुली-श्रेया अशोक जानकर (सीकेटी स्कूल, नवीन पनवेल) विजेती, आराध्या ढेंडे (उलवे नोड) उपविजेती, मुले-विहान अम्बास्था (नवी मुंबई) विजेता, अश्विक चव्हाण (डीएव्ही पब्लिक स्कूल, नवीन पनवेल) उपविजेता; १३ वर्षाखालील : मुली-त्रिशा शेखर पावशे (डीएव्ही पब्लिक स्कूल, नवीन पनवेल) विजेती, श्रेया अशोक जानकर (सीकेटी स्कूल, नवीन पनवेल) उपविजेती, मुले-अद्वित गुप्ता (डीपीएस स्कूल, नेरूळ) विजेता, मंदार राणे (नवी मुंबई) उपविजेता; १५ वर्षाखालील : मुली-रूद्रा राजेश सरवणकर (सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल) विजेती, अनन्या मराठे (नवीन पनवेल) उपविजेती, मुले-अद्वित गुप्ता (डीपीएस स्कूल, नेरूळ) विजेता, मंदार राणे (नवी मुंबई) उपविजेता; १७ वर्षाखालील : मुली-क्रिशिका धांडे (डीएव्ही पब्लिक स्कूल, खारघर) विजेती, रूद्रा राजेश सरवणकर (सेंट जोसेफ स्कूल, नवीन पनवेल) उपविजेती, मुले-अद्वित गुप्ता (डीपीएस स्कूल, नेरूळ) विजता, रेयांश साह (बालभारती पब्लिक स्कूल, खारघर) उपविजेता; १९ वर्षाखालील : मुली-क्रिशिका धांडे विजेती, जिया नेगी (दोघी डीएव्ही पब्लिक स्कूल, खारघर) उपविजेती, मुले-देवांश ठक्कर (डीएव्ही पब्लिक स्कूल, नवीन पनवेल) विजेता, सिद्धार्थ देशपांडे (बालभारती पब्लिक स्कूल, खारघर) उपविजेता; पुरुष एकेरी : प्रियांकुश बोस (उलवे नोड) विजेता, विजय यादव (नवी मुंबई) उपविजेता; ज्येष्ठ : विजय यादव विजेते, पॉल डीमेलो (दोघेही नवी मुंबई) उपविजेते.



## विधानसभेत भारतीय संघाचे अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत मंगळवारी (दि. २) मर्यादित २० षटकांच्या विश्वचषक स्पर्धेतील विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन करण्यात आले. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी अभिनंदन प्रस्ताव मांडला.

नुकत्याच पार पडलेल्या नवव्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात बार्बाडोस येथील किंग्सटन ओव्हल मैदानावर भारताने दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघाचा पराभव केला आणि वर्ल्डकप जिंकला. याबद्दल विधानसभेत कर्णधार रोहित शर्मासह क्रिकेट संघातील सर्वच खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले.

# मला आतून जे चांगले वाटते ते मी करतो!

## निवृत्तीबाबत रोहित शर्माची 'मन की बात'



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. १३ वर्षांनंतर भारताने दुसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकप ट्रॉफी जिंकली आहे. भारताचा कर्णधार रोहित शर्मासाठीही हा विश्वचषक शेवटचा होता. त्याच्या निवृत्तीबाबतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला सात धावांनी पराभूत केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना रोहित म्हणाला की, टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्यासाठी यापेक्षा चांगली वेळ असू शकत नाही. तो म्हणाला, मी भविष्याचा विचार करून असे निर्णय घेत नाही. आतून मला जे चांगले वाटते ते मी करतो. मी भविष्याचा फारसा विचार करीत नाही. गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषक झाल्यानंतरही मी हा विश्वचषक खेळणार की नाही याचा विचार केला नव्हता.

रोहित शर्मा पुढे म्हणाला, मी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेईन, असा विचार केला नव्हता, पण परिस्थिती अशी आली की, हा निर्णय घ्यावा लागला. मी आयपीएल खेळत राहीन.

महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने विश्वचषक जिंकला तेव्हा रोहित शर्माही त्या संघाचा सदस्य होता. तेव्हापासून आतापर्यंत रोहित प्रत्येक टी-२० विश्वचषक खेळला आहे, पण चॅम्पियन होऊ शकला नाही. तब्बल ११ वर्षांनंतर त्याला हा दिवस पाहण्याची संधी मिळाली. टी-२० विश्वचषक दोनदा जिंकणारा रोहित हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी तो केवळ खेळाडू म्हणून खेळला होता, तर या वेळी त्याच्या नेतृत्वाखाली संघाने विश्वचषक जिंकला आहे.

# भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वी उशिरा उठला होता बांगलादेशचा खेळाडू

## बस चुकली, संघ व्यवस्थापनाने केली शिक्षा

**अँटिगा : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धा नुकतीच अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये झाली. भारतीय संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून विजेतेपद पटकावले. दरम्यान, आता एक बातमी समोर आली आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यात झालेल्या सुपर ८ फेरीच्या सामन्यात बांगलादेशच्या एका अनुभवी खेळाडूची झोप लागली होती. त्यामुळे त्याची बस चुकली. यासाठी संघ व्यवस्थापनाने या खेळाडूला शिक्षाही केली.



भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वी उशिरा झोपलेला खेळाडू म्हणजे बांगलादेशचा स्टार गोलंदाज तस्किन अहमद. तो बांगलादेशच्या टी-२० संघाचा उपकर्णधारही आहे. त्याने विश्वचषकातील सात सामन्यात एकूण आठ विकेट्स घेतल्या. तस्किनने ग्रुप स्टेजमध्ये श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या होत्या. या चमकदार कामगिरीने सुपर ८ फेरीतील त्याची दावेदारी चांगलीच भक्कम झाली होती.

जेव्हा नाणेफेकीनंतर बांगलादेशच्या कर्णधाराने प्लेइंग इलेव्हन जाहीर केली, तेव्हा संघात एक बदल करण्यात आला होता. ज्यामध्ये संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज तस्किन अहमदच्या जागी जॅकर अलीचा समावेश करण्यात आला होता. या बदलामुळे बांगलादेश क्रिकेट संघाचे चाहते आश्चर्यचकित झाले, कारण तस्किन चांगल्या फॉर्ममध्ये असून भारताविरुद्ध चांगला खेळू शकला असता. अचंबित झालेल्या चाहत्यांना त्या वेळी काहीच समजले नाही, पण आता तस्किनला संघात स्थान का मिळाले नव्हते, याबद्दल आता खुलासा झाला आहे.

बांगलादेश आणि भारत यांच्यात २२ जून रोजी सामना झाला होता. हा सुपर ८चा सामना बांगलादेशसाठी खूप महत्त्वाचा होता. या सामन्यात सहभागी होण्यासाठी बांगलादेशचा संघ सकाळीच स्टेडियमकडे रवाना झाला. संघाचे सर्व खेळाडू आणि सहाय्यक कर्मचारी बसमध्ये येऊन बसले होते. दरम्यान, वेगवान गोलंदाज तस्किन अहमदची सर्व संघ वाट पाहत होता. त्या वेळी तस्किन कोणाचाही फोन उचलत नव्हता.

बांगलादेशचे प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघा संघासह स्टेडियमकडे रवाना झाले, ज्यामुळे तस्किन अहमदला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नाही. क्रिकट्रॅकर स्पोर्ट्स वेबसाइटनुसार तस्किन झोपला होता. तो हॉटेलमधून खाली आला तेव्हा बस निघून गेली होती. यानंतर तो स्वत:हून स्टेडियममध्ये पोहचला.

**मागितली माफी**

बांगलादेश बोर्डाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, हे खरे आहे की, तस्किन अहमदनंतर संघात सहभागी झाला, कारण त्याची टीम बस चुकली, पण तो का खेळला नाही हे फक्त प्रशिक्षकच सांगू शकतात. भारताविरुद्धच्या सामन्यात तो संघाच्या योजनेचा भाग होता की नाही याचे उत्तर फक्त प्रशिक्षकच देऊ शकतात. जर प्रशिक्षक किंवा खेळाडूंमध्ये मतभेद झाले असते, तर तो अफगाणिस्तानविरुद्धच्या पुढील सामन्यात कसा खेळला असता. तस्किनने वेळेवर उठू न शकल्याबद्दल त्याने खेळाडू आणि इतर सर्वांची माफी मागितली होती.

# इंग्लंड संघ युरो कपच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल

## स्लोव्हाकियाला नमवले

**गेल्सेनकिर्चेन : वृत्तसंस्था**

ज्युड बेलिंगहॅमच्या अलौकिक कौशल्यामुळे इंग्लंडला युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखता आले. भरपाई वेळेत बेलिंगहॅम आणि त्यानंतर अतिरिक्त वेळेतील पहिल्याच मिनिटाला कर्णधार हॅरी केनने केलेल्या गोलमुळे इंग्लंडने स्लोव्हाकियाचा २-१ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. इंग्लंडची गाठ आता स्वित्झर्लंडशी पडणार आहे.

इंग्लंडचा खेळ पुन्हा एकदा निराशाजनक झाला. त्यांच्या खेळात विश्वासाचा अभाव होता. स्लोव्हाकियाने सामन्याला धारदार सुरुवात केली. २५व्या मिनिटाला इव्हान श्रांझने स्लोव्हाकियाला आघाडीवर नेले. स्लोव्हाकियाचा हा धोक्याचा इशारा इंग्लंड समजू शकले नाहीत. उत्तरार्धात फिल फोडेनने गोल केला, मात्र पास स्वीकारण्यापूर्वी तो 'ऑफ-साइड' असल्याने पंचांनी गोल अपात्र ठरवला.

इंग्लंडला गोलसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत होती. ९० मिनिटांनंतरचा भरपाई वेळही संपत चालला होता. इंग्लंडच्या चाहत्यांचा धीर सुटत चालला होता. अखेर सामना संपण्यास केवळ ३० सेकंदांचा अवधी असताना थ्रो-इनवर खोलवर आलेला चेंडू बेलिंगहॅमने 'बायसिकल किक' मारत गोलजाळीत धाडला आणि इंग्लंडला बरोबरी साधता आली. सामना ३० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत नेण्यात त्यांना यश आले. दोनच दिवसांपूर्वी २१व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या बेलिंगहॅमने आपला वाढदिवस, असा अनोखा साजरा केला.

अतिरिक्त वेळेत पहिल्याच मिनिटाला आलेल्या क्रॉसवर केनने हेडर मारून गोल करताना इंग्लंडला आघाडी मिळवून दिली. यानंतर स्लोव्हाकियाला गोल करता आला नाही.

# पनवेल मनपातर्फे सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पनवेल महापालिका आणि रायगड जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वर्षाखालील मुले व १७ वर्षे मुली यांच्या सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धेचा कामोठे येथील इंडो स्कॉट शाळेमध्ये मंगळवारी (दि. २) शुभारंभ झाला. या स्पर्धेत ३६ शाळांमधील संघानी सहभाग घेतला आहे.



स्पर्धेच्या शुभारंभास क्रीडा व सांस्कृतिक उपायुक्त बाबासाहेब राजळे, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू, सूर्यकांत ठाकूर, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड, इंडो स्कॉट्स ग्लोबल स्कूलच्या मुख्याध्यापिका, मुख्य क्रीडा अधिकारी हर्षा उलाल, सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा प्रमुख समीर रेवाळे, विशाल यादव, रोहित मस्के, पंच प्रमुख अक्षय शेट्टे उपस्थित होते. त्यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या संघांतील स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी इतर क्रीडा शिक्षक, शाळेचे सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महापालिका आणि जिल्हा क्रिडा परिषद रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येत असलेल्या या स्पर्धेला स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. अतिरिक्त आयुक्त भारत राठोड यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी पहिला सामना १५ वर्षाखालील मुलांमध्ये कारमेल शाळा कळंबोली विरुद्ध विश्वज्योत हायस्कूल खारघर यांच्यात रंगला.

जीवेत् शरदः शतम्!

रविंद्र शामा
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
मिन्नत नाईक

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com